म. ग्रं. सं. ठाणें

विषय

ग्रंथ क्रमांक

लेखक शंकर बाळकृष्ण
डेम्बर

पुस्तकाचें नांव संसारदृष्टि.

सन

33

सं. क्र.

# संसारदृष्टी.

## निबंध

म. ग्रं. सं. ठाणे
विषय कादंबरी
सं. नं.
सन १८८३

# संसारहाट.

मुंबई ग्रंथ संग्रहालय

पुस्तक

## शंकर बाळकृष्ण महाडेश्वर

यांनीं

तयार केलें.

तें

कर्त्यानें आणि रामचंद्र बाळकृष्ण महाडेश्वर

यांनीं तपासून

मुंबई येथें

"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापिलें

सन १८८३.

रने हक्क मालकांनीं आपणाकडे ठेविले आ

किंमत ०॥ आणे.

FOR THE YOUNG AND THE OLD
'HOW TO GO ON IN THE WORLD.'

# संसारदृष्टि.

हें

पुस्तक

## शंकर बाळकृष्ण महाडेश्वर

यांनीं

तयार केलें.

तें

## कर्त्यानें आणि रामचंद्र बाळकृष्ण महाडेश्वर

यांनीं तपासून


मुंबई येथें

"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापिलें.

सन १८८३.



(सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं आपणांकडे ठेविले आहेत.)


किंमत ४॥ आणे.

# प्रस्तावना.

—00—

एके दिवशीं आपल्या या भारतवर्षीय जनांत सदाचरणी, सदुद्योगी आणि सुशिक्षित लोकांची संख्या फारच कमी कां? याचा विचार करीत असतां, आठवलें कीं, आपल्या पूर्वजांचे गुण उगीच पोकळ गर्वानें वाखाणीत नसणें आणि वडिलोपार्जित चालत आलेल्या चालीं कशाही वेडगळ असल्या तरी त्यांचें मंडण करणें अशी जी केवळ आमची स्वाभाविक स्थितिच बनून गेली आहे, त्यामुळेंच आह्मांस असें करणें हाच स्वदेशाभिमान आहे, असें वाटून खरा जो निर्दोष स्वदेशाभिमान तो यांच्या जोरामुळें टिकत नाहींसा झाला आहे. त्या विषयीं कांहींच सुचत नाहीं. कारण आपल्या अंतःकरणांत या विचारांस तर आह्मीं पूर्वींच आश्रय दिला आहे, ह्मणून एकाच स्थळीं एकाच काळीं दोन्ही गोष्टींचा समावेश होऊं शकत नाहीं. तर आतां ह्या खोट्या करड्या स्वदेशाभिमानाचें कांहीं तरी निर्मूल कसें होईल, हा विचार करीत असतां असा कांहीं तरी हलक्याच किंमतींत उपलब्ध असा लहानसा ग्रंथ तयार करून तो स्वदेशबंधूंपुढें चिकित्सेकरितां सादर करण्यांत कांहीं तरी स्वदेशाची अल्पस्वल्प सेवा केल्यासारखें होईल असें वाटलें.

हा मनांतील हेतु कितपत सिद्धीस जाईल तें आतां सांगवत नाहीं. परंतु इतकेंच मात्र ह्मणवतें कीं, सुज्ञ लोकांवर ह्मणजे चित्त ठेवून सारासार विचारानें हें पुस्तक वाचणाऱ्यांवर ही गोष्ट अवलंबून आहे.

मुक्काम मुंबई,<br>
ता० १ माहे फेब्रुवारी<br>
सन १८८३ इ० } शं० वा० म०

# अनुक्रमणिका.


| विषय. | भाग १ ला. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ प्रपंचपरमार्थी कर्तव्यकर्म—स्वधर्म.... .... .... | | १ |
| २ सदाचरण—दुराचरण .... ................ | | ३ |
| ३ बालवर्तन - शिक्षण.... .................... | | ८ |
| ४ सदुद्योग .... ........ .................... | | १० |
| ५ खरा मोठेपणा ( स्त्री शिक्षण ).... ......... | | १९ |
| ६ स्वहितसंबंधी अनुभविक परिणाम.... ........... | | २५ |
| | भाग २ रा. | |
| ७ संसारदृष्टीची देशोन्नतिविषयीं नीतिबोधपर सुरस गोष्ट. .............. | | ३० |
| ८ प्रपंचीं नीतिबोधपर थोर पुरुषांचीं वचनें. .... | | ६३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

# ' HOW TO GO ON IN THE WORLD.'

# संसारव्यवहार

## भाग १ ला.

विवेकें क्रिया आपुली पालटावी ॥
अती आदरें शुद्ध क्रिया धरावी ॥
जगीं बोलण्यासारखें चाल बापा ॥
मनीं कल्पना सोड संसारतापा ॥ १ ॥

रामदास.

## ' प्रपंच परमार्थी कर्त्तव्यकर्म–स्वधर्म. '

आह्मां मनुष्यांचें मुख्य कर्त्तव्यकर्म ह्मटलें ह्मणजे स्वधर्मानें वागणें हें होय. आपण स्वधर्मानें वागलों असतां आपणांस सत्सुखच प्राप्त होईल, यांत संशय नाहीं. परंतु ज्या अर्थी स्वधर्माचा पाया, जें सदाचरण व सुशिक्षण, तें आह्मांत नाहीं, त्या अर्थी ही जी आमचे लोक विपत्ति भोगतात, हें ह्या आपल्या परधर्मानें वागण्याचें फलच होय, यांत कांहीं नवल नाहीं. कारण असें ह्मटलेंही आहे कीं, **' स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः '** ह्मणून आपणास प्रथम आपला स्वधर्म काय आहे, हें जाणणें फारच आवश्यक आहे. कारण तो जाणून त्याप्रमाणें चालल्यास आपोआप आपली ही दुर्दशा नाहींशी होऊन आपणास सुदशा प्राप्त होईलच होईल.

आतां स्वधर्माचें बीज ह्मटलें ह्मणजे आपण कोण, आपलें स्वरूप काय, आपली खरी योग्यता काय, इत्यादि गोष्टींचें ज्ञान अंतर्बाह्य सत्संगतीनें प्राप्त करून घेणें, हें होय. येणेंकरूनच प्रपंचांत परमार्थाचा लाभ होऊन सर्वांचें स्वहित साधणार आहे. परंतु ह्या स्वधर्माचें कांहीं किंचित् तरी ज्ञान होण्यास आपल्या अंगीं सदाचरण पूर्णपणें बाणलें पाहिजे, तरच आपणास तें ज्ञान होण्यास आपण सत्पात्र ह्मणजे योग्य अधिकारी होऊं. जों पर्यंत हें सदाचरण आपल्या अंगीं ठसलें नाहीं तों पर्यंत आपण कितीही विद्वान्, शास्त्रज्ञ, पंडित, व्युत्पन्न, असे झालों तरी आपल्या अंतःकरणांतील निंद्य विषयतळमळ व दुष्ट गुणांचा जंग, हीं कधींही नाहींशीं होणार नाहींत. आणि आपण सुखार्थ कितीही इतर उपाय केले तरी ते व्यर्थ जाऊन उलटे अपायरूपच होतील. तर आतां हें सदाचरण आमच्या अंगीं एकसारखें सतत वास करण्यास व इतर आपल्या जवळच्या आप्तवर्गबंधुमित्रमंडळींत त्याचा पाया पडण्यास आपणच स्वतः बालपणापासून सत्यास आवडीनें सर्वथैव निर्भीडपणें अनुसरून बोलणें, चालणें, वागणें, अशी केवळ दृढ संवय लावणें, या शिवाय दुसरा सोपा मार्ग नाहीं. हा क्रम बालपणापासून प्रीतीनें निश्चयपूर्वक चालविला असतां जसा विजयी होईल तसा नंतर क्वचित् होतो. ह्मणून सर्व आईबापांनीं आपणही असेंच वागून आपल्या मुलांबाळांकडून तसें करविल्यास मात्र त्यांस आईबापें हें नांव शोभेल, नाहींतर पशुपक्ष्यादि योनींतही पुष्कळ प्राणी वीतात आणि आईबापें होतात. त्यांचसारखे इंद्रियविषयजन्य ज्ञानानें, किंबहुना विशेषही मूर्खरीतीनें

आपले कित्येक लोक वागतात, त्यांस मनुष्य ही तरी पदवी कशी साजत असेल ती साजो. अंगीं मात्र द्विपाद् पशूंचीही योग्यता नाहीं.

## ‘ सदाचरण—दुराचरण. ’

आतां सदाचरण सदाचरण ह्मणजे काय, याचा थोडासा विचार करूं. इतर प्राण्यांत आणि आह्मां मनुष्यांत अंतर पाहूं गेलें असतां एक सारासार- सत्यासत्य—सदसद्विवेकबुद्धिज्ञान हेंच होय. ह्याचा योग्य उपयोग करणें याचेंच नांव सदाचरण. सारांश सदाचरण ह्मणजे, सत् ह्मणजे सत्य, यास अनुसरून सर्व कायिक, वाचिक, व मानसिक, आचरण ह्मणजे वर्तन असणें. परंतु खऱ्या खोट्याच्या मिश्रणामुळेंच ही एवढी गडबड होते. खोट्या गोष्टी मोहक असून या चर्मदृष्टीस स्वार्थ दाखवून भुलवितात आणि विवेकदृष्टि ( ज्ञानदृष्टि ) आह्मांकडून बंद करवितात. अशी एकदां आपली विचारदृष्टि बंद झाली ह्मणजे तें दुग्धोदक पिऊन आह्मांस ढाळ होऊं लागतात व अशा रीतीनें सर्व ज्ञान निघून गेल्यावर मग अज्ञान आह्मांत सुरक्षितपणें घर बांधतें. नंतर आपलें सर्व वर्तन त्याच्या नादाचें ह्मणजे दुर्वर्तन होतें. मग पुढील दशा—विपत्तिरूप परिणाम—तर आपल्या डोळ्यांपुढें प्रत्यक्ष येऊन उभी राहते. इतक्यांत पश्चात्तापाची झुळूक लागूं लागते. पण उपयोग काय? सर्व जळून खाक होऊन जमीनदोस्तही होण्याच्या बेतांत आल्यावर मग तें गर्दभी वैराग्य—आयत्यावेळीं विहीर खणणें—कामाचें काय? याविषयीं एका ठिकाणींही सांगितलें आहे. ‘ प्रोदीप्ते भवने तु कूपखननं कोर्थः प्रयत्नो महान्? ’ जसजसें हें अज्ञान

आह्मांत हळूहळू गुपचूप समजूं न देतां शिरूं लागतें, तसतशा पुष्कळ अडाणी चाली धर्ममिषानें आह्मांत शिरतात, व मग अढळ वसति करितात. अशामुळें साहाजिक जे सूक्ष्मपणें आह्मांत दुर्गुण लपून लपून ह्मणून राहतात, त्यांची थोडीशी तपशील सांगतों, ह्मणजे त्यांचा त्याग करण्यास आपणांस बरें पडेल. कित्येक लोक असे असतात कीं, ते दुसऱ्यांच्या सद्गुणांचा आपण स्वीकार करण्याचें सोडून उलटी त्यांची निंदा व हेळणा मोठ्या हैसेनें करितात, दुसऱ्यांची वाहवा, नांव, लौकीक, झाल्यास यांच्या पायांची आग कपाळास चढते. कित्येक असे कुटाळ, मत्सरी, व कपटी असतात कीं, आपल्या अंगच्या गुणांत दुसरा कोणी विशेष प्रवीण असल्यास किंवा दुसऱ्याचें वर्चस्व झाल्यास द्वेषानें त्याची कांहीं तरी खोड काढितात. कित्येकांचें मन इतकें करूनही थंड किंवा शांत न होतां विलक्षण अमानुषी कर्म करण्यासही ते प्रवृत्त होतात. काय हा दुष्ट सूड! दुसऱ्याचा कमीपणा पाहणें हेंच कित्येकांचें समाधान असतें. कित्येकांस साधारण भाषणांतही कुत्सितपणाचे हृदयास टोंचून आरपार जाऊन अंतःकरणावकाशांत सदा जागृत राहणारे असे वाग्बाण मारण्याची व छद्में काढण्याची दुष्ट असुगी संवयच लागून गेली असते, आणि ते त्यांतच आपली हुशारी आपणच मिरवितात. कित्येकांची जीभ स्वाधीन नसल्यामुळें उगीच थट्टेथट्टेंतच उद्धटपणानें कळ लावून वैमनस्य उत्पन्न करितात. कित्येक सहज गंमतींत करमणुकीकरितां अथवा भीडेनें ह्मणून थोडें असत्याचें ह्मणजे लबाडी बोलण्याचें, चालण्याचें पाणी पितात. मग असा जाणून बुजूनच

असत्यरूप काळसर्पास थारा देतां देतां त्या विषामुळें आपणास शुद्धिही न राहतां अशा कांहीं अनिर्वाच्य दुष्ट संवयी आपणास घट्ट खिळून टाकतात कीं आपली स्वभावप्रकृति सर्व अंशीं भयंकर होते. अशा दुर्जनांची कृपा ही भयंकर तामसीच, राक्षसीच ह्मटली पाहिजे; मग त्यांच्याठायीं कितीही इतर सद्गुण वसोत.

'दुर्जनः परिहर्तव्यो विद्ययालंकृतोऽपिसन् ॥
मणिना भूषितः सर्पः किमसौन भयंकरः ॥ १ ॥

हे सर्व दुष्ट खल–दीर्घसूत्री, छद्मी, वाचाळ, आळशी, द्वेषी, कपटी, कुचर, अहंकारी, लोभी, खोटें बोलणारे व वागणारे, व्यर्थ तारीफ किंवा खुशामत करणारे इत्यादिक–सर्वदा वर्जावे. फार काय सांगावें? कोळसा उगाळावा तितका जास्तच काळा होतो, व उगाळणाराच्या हातास काळसर करितो. कडू कारलें तें कारलेंच. इतर कितीही गोड मधुर मधुर पदार्थ जरी त्यांत घातले किंवा कोणताही उपचार केला तरी उलटे सर्वच कडू होणार. ह्मटलेंच आहे 'भूयोऽपि सिक्तः पयसा घृतेन। न निंब वृक्षो मधुरत्वमेति.'

आतां चंदन उगाळल्यानें कसा अधिक अधिक सुगंध फांकतो तें पाहणें आहे. सदाचरणी पुरुष नेहमी शक्तिप्रमाणें थोडाबहुत निर्लोभ निष्काम सतत वाढणारा परोपकार कृतघ्नांवरही करितात. येणेंकरून त्यांच्या ह्या अनुपम परोपकारशीलतेनें, त्यांच्या संगतीनें आणि त्यांचीं हीं अशीं घडलेलीं योग्य अनुकरणीय कृत्यें पाहून, ऐकून, दुष्टही सुधारतात. त्यांच्या सद्गुणांची प्रशंसा करावी तितकी थोडीच. भूतमात्रीं दया, अपकाऱ्यांशीं क्षमा, मनाचेठायीं

शांति, उल्हास, उत्साह, प्रामाणिकपणा, औदार्य, विश्वासूपणा, खरेपणा, सरळपणा, नीति, सचोटी, बुद्धीची स्थिरता, मनःसंयमन, समंजसपणा, मनमिळाऊपणा, एकोपा, साळसूदपणा, सहनशीलता, व्यवहारज्ञानाचा सदुपयोग, प्रसंगावधान, मर्दपणा, साहस, गांभीर्य, लीनता, सभ्यपणा, निर्दंभ, निर्लोभ, निरहंकृति, आदरशीलता, सौम्यपणा, निर्दोष चौकसपणा, प्रसंगीं समयसूचकता, धारिष्ट, धैर्य, शूरत्व, पत व अब्रु राखण्याविषयीं शहाणपणा, धोरण, अक्कल, कुशलता, भलाई, व्यवस्थितपणा, ऐपती प्रमाणें मितव्यय, नियमितपणा, जितेंद्रियत्व ह्मणजे मनोनिग्रह, परमेश्वरीं प्रेम व भीति, खऱ्याची आवड, व सत्याकारितां नाहीं नाहीं तीं अचाट संकटें सोसून दृढ निश्चयपूर्वक तदर्थ एकसारखा अबाधित सदुद्योग, आस्थेवाईकपणा, इत्यादि अनंत सद्गुण त्यांच्याठायीं निरंतर जणूं काय खेळूंच लागतात. त्यांची कोणी निंदा, अपमान किंवा उपमर्द केला असतांही ते त्यापासून सद्गुणावग्रहण करितात. त्यांस ठाऊक असतें कीं, 'निंदकाचें तोंड साबणाची वडी, देहाची पासोडी शुद्ध केली—तुकाराम.' त्यांच्या क्रोधांत ही जें शांत स्थिरपणानें सहनशीलतेचें त्यांचें सुरस भाषण होतें तेणेंकरून सुधारणूकच होत असते. अशानें शत्रूही मित्र होतात. ही त्यांची अनुपम शांति केवळ दिव्य औषधच होय. त्यांच्या तोंडावाटे कोणाचीही निंदा होत नाहीं. त्यांस अनुभवासिद्ध माहित असतें कीं चांगले मनुष्य नीतीनें वश होतात आणि वाईट आहेत ते दयेनें आपलेसे होतात. परंतु ज्या दयेनें, कृपावलोनानें किंवा दानानें आळसादि दुर्गुणांचें प्रोत्साहन होईल किंवा बीज उद्भवेल

असें त्यांस वाटतें, त्याच्या भरीस मात्र ते मुळींच पडत नाहींत. गरजवंत किंवा दुःखी मनुष्य आपलें सहाय आपल्या आपणच करावयास समर्थ होईल अशाच रीतीनें त्यास मदत करितात.

न्यायदृष्ट्या पाहायास गेलें तर हीच खरी कळकळ. अशा कळवळयापासून त्या दुःखार्तास दोन फायदे होतात. एक, आलेल्या दुःखाची निवृत्ति, व दुसरा, आपल्याच अंगीं तें दुःख निवारण्यापुरतें सामर्थ्य येणें. तसेंच, आपणास पाळतां येईल, व योग्य, असेंच अभिवचन देणें योग्य वाटल्यास देऊन त्याविषयीं प्राणावर बेतली तरी ते तें सिद्धीस नेतात. ते कितीही मोठा अम्मल बजावण्याचे हुद्यांवर असले तरी त्यांच्या डोळ्यांवर त्या वडेजावीचा धूर येत नाहीं. कदाचित् कोणीही कांहीं कोणाविषयीं बरें वाईट कान फुंकले असतां किंवा साळसूदपणा दाखवून चहाड्या जरी सांगितल्या तरी अधिऱ्या हलक्या कानाचे नसल्यामुळें त्यांचें मन कोणाविषयीं कलुषित होत नाहीं. ते कोणाचेही नादीं लागत नाहींत व आपल्या नादीं कोणासही लावीत नाहींत. कनिष्ठाचाही कोणत्याही प्रसंगीं पाणउतार किंवा अपमान न करितां सर्व गोष्टींकडे कानाडोळा करून केवळ आईप्रमाणें त्यांविषयीं सर्व कांहीं तजवीज करितात. न्याय करते वेळींही हातीं असलेल्या विषयाविषयीं सर्व पक्षांच्या गोष्टी गंभीर मुद्रेनें स्वस्थपणें ऐकून घेऊन तत्संबंधी सर्व कोनाकोपऱ्याची माहिती मिळवून कज्जाचें खरें खरें स्वरूप ओळखून शेवटीं निकालांत सत्यन्याय आणि दया हीं ओतप्रोत भरलेलीं आहेत, असें स्पष्ट दाखवितात. 'युक्तियुक्त

प्रगृण्हीयाद्बालादपि विचक्षणः' हें जाणून आपल्याहून लहान किंवा नीचांपासून ही ते सद्गुणावग्रहण करितात. काय वर्णावा त्यांच्या अक्षय्य सदाचरण संपत्तीचा महिमा! ते परलोकवासी झाल्यावरही आपल्या चरित्र श्रवणानें व ग्रंथांनीं जनहिताचें काम निरंतर करीतच असतात. धन्य असें त्यांसच ह्मणावें. आतां हें सदाचरण कसें व कोणत्या कालीं संपादन केलें पाहिजे, याचा कांहीं विचार करूं.

## बालवर्त्तन व शिक्षण.

आह्मांत अशी एक चमत्कारिक चाल प्रचारांत आहे कीं बहुतेक आईबापांस वाटतें, लहान मुलें अज्ञान आहेत, ह्मणून त्यांच्याशीं कौतुकानें अनीतीच्या चेष्टा किंवा सहज गंमतींत ह्मणून खोटें बोलून टवाळी केली असतां किंवा कुचेष्टा मांडली असतां कांहीं चिंता नाहीं. पण हा त्यांचा समज गैर असून मोठा भयंकर आहे. त्यांस ठाऊक नाहीं, कीं बहुतकरून सर्व मुलांच्या अंगीं आपल्या समक्ष जवळील लोक वागतील, बोलतील, चालतील, करतील तर अनुकरण करण्याची एक अद्भुत आश्चर्यकारक उपजत संवय असते, व ही संवय तीं मोठीं झाल्यावर ही त्यांच्या अंगीं दिसून येते, याकरितांच सज्जनांनीं ह्मटलें आहे, 'सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो.' ह्मणूनच बाळपणीं त्या कोमळ निर्मळ बुद्धिअंकुरास सदाचरणयुक्त सुशिक्षणाचें शुद्ध पाणी बीजांतच मिळेल तर तो वृक्ष फारच चांगला प्रफुल्लित होईल. यास्तव मुलें चांगलीं सुस्वभाव व निरोगी राहण्यास तीं उपजल्यापासून सुविचारशील मनुष्यांच्या संगतींत असलीं पाहिजेत. याकरितांच

दाई, आई, बाप, बंधु, बहिणी, इत्यादि सर्व इष्ट मनुष्यें सदाचरणी व सुशिक्षित असलीं पाहिजेत; व हीं हीं चांगलीं व्हायाला एकंदरींत सदाचरणास सर्वत: भागीं सर्वानींच आपल्या मनांत आणि वर्तनक्रियाकर्मांत संपूर्ण आश्रय दिला पाहिजे आणि तशाच ग्रंथांचें निरूपण केलें पाहिजे, तरच आपलें खरें हित होण्याची गोष्ट साधेल; नाहीं तर हें जिणें नरकवासाप्रमाणें होय.

ज्या अर्थी मुलें जाणतीं होऊन त्यांचींच पुढें कुटुंबें होतात, व अशा कुटुंबमंडळीच्या माणसांहीं देश होतो ह्मणजे सर्व राष्ट्र बनलें जातें, त्या अर्थी कोणताही देश सुधारून त्यांतील चालत आलेल्या वाईट चाली रीतिभाति मोडून बऱ्यांचा प्रचार पडून शेवटीं तो देश ऊर्जित दशेस येण्यास मुख्य उपाय ह्मटला ह्मणजे बाल शिक्षण होय. बाल शिक्षण ह्मणजे मुलींस व मुलांस लहानपणापासून घरांत तशीच बाहेर सरळ सुशील मनुष्यांची संगति आणि नीतिग्रंथावलोकन हेंच होय. विद्या हें एक प्रकारचें अंजन आहे. तेणेंकरून विचारदृष्टीचे डोळे उघडून सदाचरण अंगीं असल्यास सन्मार्गाकडे गति होते. अशा विद्वानास सर्व गोष्टींची खरी किंमत समजते. ह्मणून अशा सत्पुरुषांच्या सहवासानें जशी चांगली स्थिति होते तशी कशानेंही होत नाहीं. विद्या ह्मणजे पुष्कळ भाषांचा अभ्यास करून वेद शास्त्र पुराण इतिहास इत्यादि अनेक विषयांत पारंगत होणें इतकेंच नव्हे तर कोणतेंहीं अध्ययन करून किंवा इतर कोणत्याही रीतीनें ह्मणजे सज्जन समागमानें आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा सदुपयोग करायास शिकणें, हें होय. थोर मनाच्या मनुष्यांच्या

भाषणानें बाळपणीं मुलांच्या शुद्ध व कोंवळ्या अंतःकरणांवर जे विलक्षण उत्तम गुणांचे ठसे उमटतात व हें जें योग्य वेळीं सद्गुणांचें बीजारोपण होतें त्याचें असें कांहीं विलक्षण सुपीक होतें कीं अशाच मुलांकडून मग पुढें प्रसंग विशेषीं देशहिताचे खरे मोठे मोठे पराक्रम झालेले आढळतात. अशींच मुलें बिकट बिकट संकटें, विपत्ति, हाल हवाल, दारिद्र्य, इत्यादि अनेक दुःखांचे वेग सहन करून शेवटीं अशीं कांहीं नांवारूपास आलीं आहेत कीं त्यांचें स्मरण ह्या आपल्या भरतभूमिकेस फारच शोभा आणतें; आणि इंत आगखीही असे कांहीं पुरुष निपजतील असें आपणास उत्तेजनही देतें. आपणच पाहतों श्री रामदास, तुकाराम, एकनाथ, आदि अनेक सत्पुरुषांच्या नांवानेंच आपल्या अंतःकरणावर काय संस्कार होतो तो, त्यांविषयीं किती पूज्यबुद्धि उत्पन्न होते ती, आणि त्यांची सत्कीर्ति कशी अजरामर होऊन सर्वत्र गाजत आहे ती. पण अशी स्थिति आळसानें आणि मिजासीनें कधींच होत नाहीं, त्यास सदुद्योगच केला पाहिजे, ह्मणूनच ह्मटलें आहे,

'आलस्यंहि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ॥
नास्ति उद्यमसमो बंधुः कृत्वा यं नावसीदति ॥ १ ॥'

## सदुद्योग.

मनुष्य जन्मास आल्यापासून उद्योग त्याच्या मागेंच लागला आहे ह्मणजे त्यानें श्रम केलेच पाहिजेत, नाहीं तर अंध, पंगु, बहिरे आणि नीच पशूही, यांचें तरी जिणें बरें, पण या आळशांचें वाईट; ह्मणून उद्योग केलाच पाहिजे.

११

'उद्योगेनैव सिद्धन्ति कार्याणि न मनोरथैः ॥
नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः ॥ १ ॥'

भावार्थ—सर्व कामें उद्योगानेंच सिद्धीस जातात. नुसत्या कल्पनांनीं जात नाहींत. निजलेल्या सिंहाच्या तोंडांत भक्ष्य–श्वापदें–कधींही आपाप पडत नाहीं, असें थोर मनुष्यांचें वचन आहे. तर सदुद्योग ह्मणजे वेळाचा सद्व्यय करणें हेंच होय. आणि आळस ह्मणजे अपव्यय. **कालाचा सद्व्यय, हेची विश्रांतीची माय,** अशी एक ह्मण आहे, ती लक्षांत ठेवून असावें. ज्याप्रमाणें आपले अन्नपानादि व्यवहार निममितपणानें आपण स्वतःच केले पाहिजेत त्याप्रमाणेंच हातीं घेतलेलें काम आपलें असें समजून आपणच स्वतः काळजीपूर्वक केलें पाहिजे. त्याविषयीं दुसऱ्यावर अवलंबून राहतां कामा नये. मनासारिखें काम स्वतःच केल्यानें होतें. '**आपुलिया बळें घालावी ते कास, न धरावी आस इतरांची**'–असें एका साधु पुरुषाच्या अभंगांत वाक्य आहे, तें सर्वथैव ग्राह्य आहे. संवय लावून घ्यावी ती लागते, ह्मणून ज्यांस बालपणापासून आपलेंही काम स्वतः न करण्याची संवय असते अशा मनुष्याचें जीवित '**पुस्तकी विद्या आणि परस्वाधीन जिणें**' याप्रमाणें परतंत्र व वांझ होतें. आळसासारिखा दुसरा क्षयरोग कोणताच नाहीं, आळस ही भिकेची बहीण आहे; आणि सदुद्योगासारखें आरोग्यरक्षक दुसरें रामबाण औषध कोणतेंच नाहीं. उद्योग ही पराक्रमाची आई आहे. ह्मणून लहानपणापासूनच सदुद्योग करण्याच्या संवयी असाव्या. परंतु कोणत्याही व्यासंगांत फाजीलपणा मात्र उपयोगाचा नाहीं. ह्मणूनच ह्मटलें आहे '**अति सर्वत्र वर्ज-**

येत्'. दृढ निश्चयात्मक बुद्धीनें कोणत्याही कार्यार्थ सतत एकसारखा अस्खलित उद्योग केल्यानें तें कार्य निःशंक साधेल. याविषयीं एक फारच उपयोगी पुरातन ह्मण अशी आहे कीं '**जो नर करणी करे सो नरका नारायण होय**' ह्मणजे आपण मनुष्यें जर सप्रेम अनन्य निष्काम भगवद्भजन करूं तर भगवद्रूपच होऊं. एवढी मोठी जर गोष्ट सदुद्योगानें साध्य होत आहे तर मग ह्या इतर साधारण गोष्टी असाध्य किंवा दुरापास्त आहेत, असें ह्मणणें निराधार होय. उंदिरांसारिखे क्षुद्र प्राणी देखील एकसारखे परिश्रम करून एकाही रात्रींत तांदुळांचे गोणाचे गोण आणि मुड्यांचे मुडे पोखरून खाऊन फस्त करितात, हें तर आपल्या नेहमींच्या पाहण्यांतच आढळतें. मग मनुष्यें काय काय करूं शकतील याचा मुळींच नेम सांगवत नाहीं. सदुद्योगाचें महात्म्य वर्णावें तितकें थोडेंच. इतिहासांतील थोर पुरुषांच्या चरित्रश्रवणावरून असें दिसून येतें कीं, उद्योगानें मोठ्या मानकऱ्यांपासून तों नीचांपर्यंत सर्व मनुष्यें उन्नतीस पोहोंचलीं आहेत. उंच नीच जातीशीं कांहींच संबंध नाहीं '**गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वयः**' असें ह्मटलेंच आहे. न्हावी, धोबी, ह्मार, चांभार, कोळी, हेलकरी, खलाशी, कलाल ह्मणजे दारू पिठेवाले, धनगर गुराखे, स्वयंपाकी, पाणके, कोष्टी, दर्जी ह्मणजे शींपी, गंवडी, सोनार, सुतार, इत्यादि सर्व लहान थोर कुळांतल्या अतिनीच केवळ कंगाल निराश्रित स्थितींत जन्मलेल्या अनेक अशक्त नाजूक प्रकृतीच्याही मनुष्यांनीं '**उत्पन्न भोजनी आणि माध्यान्ह दरीद्री**' असें असतांही आपल्या पोटापुरती भाजीभाकर मिळविण्याचा धंदा

करून फावल्याविळीं अध्ययन करून आपल्या उद्योगानें अलौकिक ज्ञानभांडार मिळविलें आहे आणि या संसाररणांत सद्वर्तनसंपन्न सदुद्योगाची तलवार गाजवून आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. हें त्या त्या देशास एक मोठें भूषणच होय. ही तर डोळसांची गोष्ट झाली. परंतु असेंही आढळतें कीं कित्येक आंधळे पांगळेही महान् महान् गणिती, गायक, वाटाडे, शास्त्री, कवि, झाले आहेत. तसेच अनेक तोत्रे, बोबडे, बहिरेही मोठे विद्वान्, वक्ते व कारागीर झाले आहेत. हातमोडक्यांनीं, पायमोडक्यांनीं, मुक्यांनींही कांहींनाकांहीं शास्त्रांत प्रवीण होऊन नांवलौकिक मिळविला आहे. हे सर्व जणूं काय आपल्यासारख्या इतर आंधळ्या पांगळ्यांसही आपल्या आश्चर्यकारक आयुष्क्रमाचें केवळ उदाहरणच घालीत इतिहासरूप खुर्चीवर बसले आहेत, आणि वारंवार असें अनुभवसिद्ध सांगत आहेत कीं उद्योगानें पंच ज्ञानेंद्रियें व पंच कर्मेंद्रियें यांतील कोणतेंही जरी उणें असलें तरी त्याचें काम अंशत: इतरांकडून चालवून घेतां येतें, असा निकट उद्योग सर्वांनीं केला पाहिजे. आपल्याही या देशांत कित्येक ठिकाणीं जे हल्लीं मोठमोठ्या हुद्यांवर कांहीं लोक आहेत ते देखील अशाच स्थितींत जन्मले होते. त्यांची मध्यान्हीची पंचाईत असल्यामुळें कित्येक श्रीमान लोकांनीं त्यांस आपहस्तें परहस्तें मदत केली होती. साक्षात भिक्षा ( माधोकरी ) मागून. जठर तर्पण करावें ! कित्येकांस तर वार लावून दिले होते. रात्रीस अभ्यासाकरितां कित्येकांस दिवा मिळणेंही मुष्कील झालें होतें. अशा प्रसंगीं त्यांनीं अभ्यास करावयास देउळांत जावें किंवा रस्त्यावरील धुराच्या दि-

त्यांखालीं वसतें. इतक्या शोचनीय स्थितींतून निभाव त्यांनीं काढला ह्मणूनच आतां स्वस्थपणानें ते केलेल्या कष्टांचें फळ भोगित आहेत ह्मणजे खाऊन पिऊन सुखी झाले आहेत. सुखवस्तु होऊन दुखानेंच ह्मणजे सदुद्योगानें चार दोन ग्रास मिळवून खाण्याजोगे झाले आहेत. 'यद्वेवोपनतं दुःखात्सुखंतद्रसवत्तरम् ॥ निर्वाणाय तरुच्छाया तप्तस्यहि विशेषतः ॥ १ ॥' हालहवाल वनवास काढून नंतर जें एक प्रकारचें सुख मिळतें तें फारच गोड असतें. ज्याप्रमाणें बऱ्याच योग्य श्रमांनंतर जी छान झोंप लागते ती उत्तम विश्रांतिरूप असते त्याप्रमाणेंच हें. असो. अद्यापि विलायतेंत चाकरलोक, हेलकरी, इत्यादि सर्व कनिष्ट स्थितींतिलही लोक आपलें नित्याचें उदरनिर्वाहाचें काम करूनही कांहीं वेळ वर्तमानपत्रें वाचण्यांत आणि इतर विद्याव्यासंगांत घालवितात. ह्मातारे, साठीपोंगे जरी झाले तरी तरुण आस्थेवाईक मुलांप्रमाणें उमेदीनें हरएक युक्ति, कलाकौशल्य शिकतात. येणेंकरून पहिल्या पराईतील जे जवान जवान लोक त्यांस जें अवर्णनीय उदाहरण मिळतें त्याची कल्पना वाचकांनींच करावी. काय त्यांची सुधारणा, थोरवी आणि ज्ञानप्रसार! कारण त्यांस सदुद्योगाची खरी योग्यता कळते ह्मणूनच तदर्थ मनःपूर्वक आवडी असते. पण आपल्या मात्र या देशांत खऱ्या ईर्षेच्या नांवानें बहुतेक ठिकाणीं शून्यच ह्मणजे आवळ्याएवढें पूज्य. स्वतःची महाराष्ट्र भाषा शुद्ध बोलणें तर रडलेंच, पण घरांतील अपभ्रंश पावलेलीही अडाणी भाषा एकसारखी मराठीत बोलतां येत नाहीं. त्यांतही कांहीं शब्द इंग्रजींतून सहज चुकून ह्मणून तोंडा-

वाटे येतातच. हें केवढें दुर्भाग्य! तशीच आलिकडेस सर्व श्रीमंत स्थितींतीलही आपल्या लोकांची धांव मराठी शिकण्यावर पाणी घालून आधीं इंग्रजी शिकण्यावर. आणि मग कोठेंही वीस पचवीस तीस किंवा चाळीस रुपयांची नोकरी मिळाली ह्मणजे झालें त्या बारावर्षांच्या तपाचें पर्यवसान. यामुळें नोकऱ्याही हलक्या व दुर्लभ झाल्या. आतां ही हमालीच बहुतेकांना आवडून तिच्या मागें लागल्यामुळें उदीम व्यापार इत्यादि निरनिराळे उद्योग स्वतंत्रपणें करण्याविषयीं कोणास स्फूर्तिही होत नाहीं. कसा कसा ह्मगुन हा स्वतंत्र उद्योगाविषयीं लोप झाला!! परंतु इंग्लंड देशाविषयीं पाहायास गेलें तर तिकडील लोक मोठे प्रवास देशपर्यटन करून मोठे मोठे विद्वान् होऊन आह्मांस क्षुल्लक किंवा हलके वाटणारे असे उद्योग मोठ्या उमेदीनें करितात; ह्मणूनच तो देश संपत्ति व वैभव ईहीं संपन्न झाला आहे. आतां त्या परकीय लोकांच्या साधारण उद्योगाविषयीं एक क्षुल्लक वाटणारें पण ठळक असें उदाहरण देऊं ह्मणजे या गोष्टीचें स्वरूप सहज साद्यंत स्पष्ट कळेल. आपण ह्या फारच स्वस्त व विपुल अशा सुया पाहतों; तशाच आगीच्या काड्यांच्या लहान लहान पेट्या देखील पाहतों; पण ह्या येतात कोठून व कशा कोणी इतक्या स्वल्प किंमतींत खपविण्याजोग्या केल्या आहेत, याविषयीं मात्र विचार केला ह्मणजे खरोखरच आश्चर्य व अचंबा वाटल्याशिवाय राहत नाहीं. यूरोप खंडांतील केवळ उत्तरेकडील नॉर्वे व स्विडन देशांहून या इकडेस हजारों कोसांवर आणल्या जातात, व ही एवढी मोठी मेहनत आंधळे, पांगळे, बहिरे, मुके, थोटे, लगडे,

अशा निर्बळ अनाथ मनुष्यांकडून योग्य रीतीनें करविली जाते. त्यांच्या कारखान्यांतील योग्य श्रमांचें हें फळ. येणेंकरून ते आळशी व भिक्षुक न राहून असा यथाशक्ति उदीम व्यापार धंदा केल्यामुळें उलटे स्वदेशसमृद्धीस आणखी जास्त कारणीभूत होतात. नाहीं तर ह्या आपल्या हिंदुस्थान देशांत चांगले सशक्त निरोगी धट्टेकट्टेही निर्धास्त धर्ममिषानें नाना सोंगें ढोंगें करून भीक मागून स्वदेशासच चावित बसले आहेत. असें स्वदेशास अधाशीपणानें खातां खातां जरी त्याचा आतां केवळ अस्थिपंजरच मात्र राहिला आहे तरी या दुष्टांची आशा ह्मणून कठीणच. यांपैकींच कित्येक आंधळे पांगळे बिन वारस मरून मग त्यांची शेंकडों रुपयांची मालमत्ता सरकारास पै, पैसे, चवल्या, पावल्या, अधेल्या, रुपये, इत्यादि नाण्यांच्या रूपानें बहुतेकवेळां मिळाली आहे, अशा पुष्कळच गोष्टी आपल्या ऐकिवांत व पाहण्यांतही आहेत. तरी एकदाचा हा लोभ सुटून त्यांस पश्चात्ताप स्वप्नींही होत नाहीं! पश्चात्ताप तो राहिलाच एकीकडेस; पण कित्येक डोळस असतांही एक तिरकी कशीही उपटून काढण्याकरितां एक किंवा दोन्ही डोळे बहुधा संध्याकाळच्यावेळीं मिटतात आणि आंधळे बनतात हें आपण प्रत्यक्ष पाहतों. काय हें दुर्भाग्य! अशाच आणखी पुष्कळ गोष्टी आहेत. आपले लोक तरणे जरी असले तरी उद्योगाविषयीं अशीं कांहीं विलक्षण रडगाणीं गात बसतात कीं तीं ऐकिल्यावर हासंच येतें. ते आळसाच्या कैफांत असे बडबडतात कीं, आतां या वयांत विद्या कसची होते, ती आठीपासून केल्यास साधली असती, आतां ध्यानांत तर कांहींच रा-

हत नाहीं, तशांत आमच्या मागें हजारों प्रापंचिक व्यवधानें, ह्या लचांडांपुढेंच फुरसतही मुळींच मिळत नाहीं, करा करा तरी काय ह्मणून!!! अशा रडत लक्ष्मीचें तारेंही त्या सुधारलेल्या देशांत नाहीं. तेथील लोकांनीं सर्व संपल्यावरही जणूं काय आठींत धिरून, किंबहुना विशेषच आस्थेनें, आपलें नवीन शास्त्राध्ययनाचें तारूं केवळ अंत:करणपूर्वक उत्कंठेच्या सानुकूळ वायूच्या जोरावर हाकारून उमेद कधींही खचूं न देतां पैलथडीस नेऊन नांवलौकिक मिळविला आहे; ह्मणूनच हे नागव्या उघड्या बोडक्याचे जगभर लाडके झाले आहेत. आज उद्योगामुळेंच एकतृतीयांश पृथ्वीवर इंग्रजी राज्याची सत्ता चालू आहे. हे मात्र प्रस्तुत कोंड्याचा मांडा करणारे खरे! विलायतेंत सांप्रत मुलांस लहानाचीं मोठीं करण्याची ह्मणजे वाढविण्याची रीति अशी कांहीं उत्तम व गुणावग्रहणकरण्याजोगी आहे कीं तिकडे आईबापें स्वत:च आपल्या मुलांस लहानपणापासूनच सहज गंमतींत गंमतींत ह्मणून इतिहास, आरोग्यशास्त्र, ज्योतिषशास्त्र इत्यादि बहुतेक अवश्य जाणण्याजोग्या शास्त्रसंबंधी गोष्टी वारंवार सांगतात, त्यांस आकाशांतील तारे दाखवून तेथील चमत्कार धडधडीत स्पष्ट समजावून देतात. मग अशानें सर्व महत्वाच्या गोष्टी त्या मुलांच्या लक्षांत सहज राहून तीं कोणतींही शास्त्रें अनायासें शिकतात. कारण त्यांतील साधारण मतलब पूर्वीच अवगत झालेला असतो अशीं उदाहरणें द्यावीं तितकीं थोडींच. तीं ऐकून केवळ चकित व्हायास होतें व आश्चर्यानें क्षणभर अक्कलही गुंग होते. असो. आतां इतकेंच मात्र सांगतों कीं,

एकसारख्या सतत उद्योगानें नाना छंद, दुर्व्यसनें, दुष्ट मोहक विषयाभिलाषपाश, यांपासून आपणास दूर राहतां येतें, सर्व कामें सोपीं होतात, कोणत्याही महत्कृत्यांची देखील विषाद वाटत नाहीं, खरी हक्काची विश्रांति खुशाल मिळते आणि संकटसमयीं पांचांवर धारण न बसतां ह्मणजे अकालिक भयानें घाबरून धांदल न होतां आपल्या आसपास घडलेल्या गोष्टी लक्ष्यपूर्वक चौकसपणानें अवलोकन करीत असल्यामुळें आपल्या आंगीं या सदुद्योगानेंच समयसूचकता येते. हा सदुद्योग व मितव्यय, या दोन गोष्टींच्याच स्वाधीन बहुधा संपत्तिही असते. ह्मणूनच 'नयेच शौर्येच वसन्ति संपदः' असें ह्मटलें आहे. स्मरणशक्ति व बुद्धि, ह्या जरी परमेश्वराच्या अद्भुत देणग्या आहेत तरी त्याही सदुद्योगानें कार्यापुरत्या बळकट निःशंक होऊं शकतात; ह्मणून मनुष्यानें सदाचरणसंपन्न असून कंबर बांधून कितीही अनर्थ गुदरले तरी निराश न होतां अधिकाधिक उमेदीनें सदुद्योग करण्याची सवयच आपणास लावून घ्यावी ह्मणजे सर्वांशीं त्याचें कल्याणच होईल.

पतितोपि कराघातै रुत्पतत्येव कंदुकः ॥
प्रायेण साधुवृत्तानामस्थायिन्यो विपत्तयः ॥ १ ॥

चेंडू हाताच्या तडाक्यानें जरी खालीं पडला तरी तो वरच उडतो, तसेच सदुद्योगी, सदाचरणी, सुशिक्षित जे लोक आहेत त्यांच्या विपत्ति बहुधा राहत नाहींत. ह्मणजे त्यांस त्यांतून पार पडून डोकें वर काढतां येतेंच. एवंच मनुष्यानें सर्व काळ कांहीं तरी सत्कार्य करण्याचा उद्देश बाळगून तो खरेपणानें व धैर्यानें तडीस नेण्यास झटावें ह्मणजे झालें.

## खरा मोठेपणा—(स्त्रीशिक्षण.)

कोणास पदवीनें, कोणास द्रव्यानें, कोणास विद्येनें, कोणास अधिकारानें, कोणास कुळानें ह्मणजे वंशानें व कोणास चांगल्या आचारानें, इत्यादि अनेक कारणांनीं नामधारी मोठेपणा येतो; परंतु वस्तुतः खरा मोठेपणा किंवा थोरपणा जो काय तो ही अक्षय्य सदाचरणसंपत्तिच होय. हेंच सत्कीर्तिभूषण. ह्यांतच अनुपम महत्व व शोभा आहे. हें प्राप्त करून घेण्याविषयीं जसे आपण स्वतंत्र आहों ह्मणजे हें काम लहानपणापासून केल्यास जसें आपल्या हातचें आहे तसें दुसरें कोणतेंच नाहीं. कोणतीही जाति असो, कोणतेंही कुळ असो, कोणतीही वंशपरंपरा असो, ही श्रेष्ठ सदाचरणसंपत्ति मिळविण्यास कशाचाही प्रत्यवाय नाहीं. सर्व कांहीं ज्याचें त्याच्यावरच अवलंबून आहे; ह्मणून सदाचरण आंगीं असावें अशी ज्यांची इच्छा असेल त्यांस आपली ही मनीषा सहज पुरवितां येईल. मात्र सुविचाराचें सतेज शस्त्र पाणीदार झळकत असलें पाहिजे. ज्या आईबापांस वाटतें कीं आपलीं मुलें ह्या सुखसाध्य संपत्तींत नांदावीं त्यांनीं बालपणापासूनच त्यांविषयीं काळजी घेतली पाहिजे. नाहींतर एकदां मुलांस असत्याची गोडी लागली ह्मणजे नकळत तशीच खोटसाळपणाची संवय लागून अतिही निंद्य कर्म करण्यास तीं मागेंपुढें पाहत नाहींत. अशीं मुलें कितीही बुद्धिमान्, पराक्रमी, विद्वान् किंवा श्रीमंत झालीं तरी देशाचें खरें कल्याण त्यांजकडून मुळींच होत नाहीं. बुद्धि तीव्र, चलाख किंवा जड असणें ही परमेश्वराची देणगी आहे. गर्भश्रीमंत असणें किंवा दुराचारानेंही विपुल द्रव्यसंपत्ति मिळविणें आणि मग परा-

क्रमही करूं लागणें किंवा मोठ्या नांवालौकिकासही चढणें, हें संभवनीय आहे. अशा ह्या पोकळ मोठेपणाचे ध्वज कितीही लावले तरी मनुष्यांची खरी योग्यता त्या त्यांच्या स्थितीवरून गणली जात नाहीं. सर्व सद्गुणांची खरी आई —निजमाता—सदाचरण हेंच होय; म्हणून तिजपाशीं जर तीं मुलेंबाळें राहतील तरच त्यांचें योग्य पोषण होऊन आपलें जन्मास आल्याचें सार्थक्य होईल. नाहींपेक्षां तेच सद्गुण जर आपल्या उपमातेपाशीं—दुराचरणापाशीं—जाऊन राहिले तर त्यांस विपरीत नाम (दुर्गुण) रूप, स्थिति प्राप्त होऊन आपणास व इतरांसही दुःखरूप होतात. शेवटीं ज्या देशांत आपण राहतों त्यासही धुळीस मिळवितात. अशा शेंकडो गोष्टी आपण पुराण इतिहासादिकांत वाचल्या आहेत. ज्याप्रमाणें अग्नि योग्य ठिकाणीं तजवीजीनें ठेवून उपयोगांत आणल्यास त्यापासून फारच सुखावह अशीं कामें—यंत्रें, गिरण्या, कारखाने चालणें, पाकनिष्पत्ति होणें इत्यादि होतात त्याचप्रमाणें या सर्व सद्गुणांची व्यवस्था सदाचरणाच्या ठिकाणीं केली पाहिजे, नाहींपेक्षां अग्निप्रमाणेंच हेही भयंकर आहेत. अवरंगझेब, नादिरशाहा, नानासाहेब पेशवे हे काय कमी शूर व पराक्रमी होऊन गेले? व ते काय विचारशून्यच होते? पण स्वार्थाच्या गुंगींत हजारों लोकांचे प्राणही यांनीं घेतले आणि आपल्या नांवास वज्रप्राय कलंक लावला! हा वज्रलेपोभविष्यातीरून लागलेला डाग आतां कधीं पुसला जाईल काय? नाहीं. पण तेच जर शिरशाहा, फेरोजशाहा, अकबर, शिवाजी, बाळाजी विश्वनाथ पेशवे, इत्यादिकां सारखे बरेच सदाचरणभूषणमंडित असते तर या आपल्या

देशाचें कितपत कल्याण झालें असतें तें लिहिणेंच नलगे. ह्मणूनच योग्य वस्तु योग्य ठिकाणीं समयोचित असली तरच शोभते, हें आपल्या वारंवार दृष्टोत्पत्तीस येतें व आपण आपल्या नेहमींच्या पाहण्यांतही वारंवार अनुभवतों. पायांतील जोडा पायांत व हातांतील सोन्याचा तोडा हातांतच योग्यवेळीं असल्यास शोभा देतो. योग्य वेळीं ह्मणण्याचें कारण असें कीं तोच पायजोडा छानदार पुणेरी जरी असला तरी पाऊसांत वापरल्यास नासून उलटा रस्त्यावरील घाणेरडा चिखल आपल्या आंगावर उडवितो, तशीच,किंबहुना विशेष भयंकर सोन्याच्या तोड्याची गोष्ट आहे. वेड्या आईनीं मूर्ख मायामोहाच्या लडिवाळपणामुळें व अज्ञानमूलक चालीमुळें लाडुकपणांतच आपल्या मुलांस उगीच सुवर्णालंकारांनीं भरून शेवटीं तीं

* या गोष्टीवरून कोणी असें समजूं नये कीं आपली मुळची दागिने घालण्याची जी चाल आहे ती भ्रांतिमूलक आहे. ती केवळ पोक्त विचाराचीच आहे. कारण आपले लोक कधीं काळीं कसेही दिवाळखोर झाले तरी त्यांजवळ चार पैशांची माया ह्मणजे पुंजी गांठीस असावी, हाच ह्या चालीचा अंतर्गत हेतु होय. तो एकसारखा अस्खलित व निर्भयपणें सिद्धीस जाण्यास्तवच या पर्वीच्या आपल्या शहाण्या लोकांनीं असा सांप्रदाय घातला होता कीं सर्वांत मौल्यवान् अशा ज्या धातु, सोनें आणि रुपें, त्यांचे अमुक अमुक दागिने नवऱ्यानें स्वकष्टार्जित द्रव्यानें स्त्रीस घालावे ह्मणजे अशा रीतीनें ह्या अमूल्य वस्तु त्यावेळीं साधारण पोक्तच वयांच्या आंगावर पडत असत; व सहज द्रव्यसंचय होई. हा केवळ कायम ऐवज होत असे; कारण अचाट प्रसंगाशिवाय किंवा कांहीं तशाच दुर्धर अडचणी शिवाय स्त्रीच्या आंगावरील भूषणें उतरून घेण्यास पुरुषाचें मन स्त्रीमोहामुळें एकाएकीं धजत नाहीं. तो जरी त्या वस्तूंचा मालक असला तरी त्याच्यानें तें तसें आपलें स्वताचें ही करणें पाहवत नाहीं.

पोरें द्रव्यलोभास्तव चोरांनीं कोणास नकळत चोरून ने-ऊन ठार मारलीं आणि तीं आईबापें नंतर आपल्या मूर्खपणाबद्दल पश्चात्तापाक्रोश करून त्या मुलांच्या नांवानें शंख करितां करितांच प्राणास मुकलीं, अशा बहुत गोष्टी आपण वर्तमानपत्रद्वारें ऐकिल्या आहेत. !!! याचें कारण स्त्रियांची कोती समजूत आणि पुरुषांच्या वेड्या प्रीतीमुळें याविषयीं डोळेझांक. ह्मणूनच स्त्रियांस, पुरुषांस व सर्वांस लहानपणापासूनच सदाचरणाच्या संवयी लाविल्यास आणि योग्य सुशिक्षण देत गेल्यास या स्वदेशांतील अनेक अरिष्टें टळणार आहेत. अशा रीतीनें पुरुष व स्त्रियाही सुशील आणि सुशिक्षित होऊन सर्वच देश सुखसंपन्न होणार आहे. नवराबायको अन्योन्य प्रेमांत सुखानें नांदून सर्वांचें संसारयंत्र सुरळीत चालणार आहे. सुस्त्री सारखा बहुधा जन्मभर आपल्या जवळ राहणारा दुसरा सन्मित्र नाहीं. बाहेर कितीही जरी श्रम केले असले तरी घरीं आल्यावर स्त्री योग्य मर्यादेनें नम्रपणें उभी राहून निष्कपटभावानें गोड गोड दोन मंजूळ शब्द आनंदानें बोलली ह्मणजे पुरुषास ते सर्व काबाडकष्ट कांहींच नाहींतसे वाटून त्या विनोदांत एकाप्रकारचें *सुख होत असतें. नाहीं तर आतां आपण कित्येक ठिकाणीं पाहतोंच, नवऱ्याचें तोंड पूर्वेस तर स्त्रीचें पश्चिमेस असतें, व असेंच परस्परांच्या वर्तनक्रमास ( ३६ ) छत्तिसाच्या आंकड्याचें वळण लागून नुसतें मुखावलोकन

---

* तत्त्वज्ञान्यांनीं सुखाविषयीं असें लिहिलें आहे कीं मपंचीं कुटुंबांत आरोग्य, सदुद्योग, सदाचरणप्रीति, आणि बुद्धिवैभव, या चार गोष्टींनींच सुखसंतोष आहे, आणि परमार्थीं सत्संग-

ह्मणजे दृष्टादृष्टही दुःसह होऊन तेणेंकरून एकमेकांत तिरस्कार व कलह उत्पन्न होतात, शेवटीं त्या स्त्रिया आपापल्या नवऱ्यांस सोडून व्यभिचारिणी होतात. कधीं कधीं पुरुषही स्त्रियांच्या कपटमय साहसामुळें नाना दुष्टाचार किंवा पोकळ वैराग्य धारण करून शेवटीं बोके संन्यासी होतात. अशा अनाचाराच्या अनेक गोष्टी आपण प्रत्यक्ष धडधडीत पाहतों. काय काय ह्मणून ही विपत्ति! सांगावी तितकी थोडीच!! किती ह्मणून हें प्रस्थ माजलें आहे!!! हें कां, याचा विचार करूं लागलें ह्मणजे आपल्या सांप्रत अपभ्रंश पावून पिढीजाद चालत आलेल्या भलभलत्या–बालविवाह, स्त्रियांस अज्ञान व कोंडून ठेवणें इत्यादि–चालींचा हा प्रताप, असें तावडतोब आपणास विचारांतीं कळून येतें. ह्मणून प्रथमतःच बालपणापासून सुशिक्षण ह्मणजे तांत्रिक कामापुरती विद्या शिकवून त्यांचें कर्तव्य- आपण स्त्री ह्मणजे व्यक्तिदृष्ट्या काय, नवरा ह्मणजे काय, लग्नसंबंध ह्मणजे काय, लग्न झाल्यावर आपण सर्वांची मर्यादा कशी काय ठेविली पाहिजे, आपली चाल चालणूक, वागणूक, स्वाभाविक आचरण कसें

---

तीनें निःसीम सप्रेम निष्काम भगवद्भजन करून त्या भगवंतीं संपूर्ण भरंवसा ठेवून त्यास भावबळानें हृदयीं आळवून त्या भक्तीनेंच आपण आनंदरूप होऊन सुखसमाधान पावणें, हेंच सर्व खरें सुख होय. एवंच आपलें सुख आपणाचपाशीं आहे. सारांश प्रपंचांत सुख ह्मणजे अपेक्षित वस्तु प्राप्ति आणि दुःख ह्मणजे जरूरीची वस्तु न मिळणें; यावरून एकंदरींत येथें दुःख निवृत्ति हेंच सुख मानलें जातें, व तें प्रथम दुःख आल्याशिवाय प्राप्त होणें नाहीं. कांहींही असो. परंतु हा सुखदुःख निर्णय सदोष आहे.

असलें पाहिजे, देश, काल, हवा, पाणी, धर्म, रीतरिवाज, जगाची राहाणी वर्तमान क्रम लक्षांत आणून कसें योग्य वागलें पाहिजे, घर संसार काटकसरीनें आणि दक्षतेनें चालवून कसा काय सांभाळला पाहिजे, मुलांचें लालनपालन व आरोग्य रक्षण कसें केलें पाहिजे, त्यांस कसा काय वर्तनाचा आणि शिक्षणाचा कित्ता घालून दिला पाहिजे, जेवण खाणाचा चातवेत कसा राखला पाहिजे, खर्चवेच कसा केला पाहिजे, पाकज्ञान, कोणाचा पाहुणचार आगतस्वागत आदरातिथ्य कसें ठेविलें पाहिजे, कसेही असाह्य अचाट प्रसंग येऊन ठेपले असून पतीचेंही अंतःकरण कंपायमान झालें असतां आपण शांत गंभीर मुद्रेनें त्याचेंही सांत्वन करून वेळ मारून कशी न्यावी, व्यवस्थितपणा, निटनेटकेपणा कसा राखावा, इत्यादि अगत्याच्या गोष्टींचें ज्ञान—त्यांस समजावून दिल्यास त्या पातिव्रत्यधर्म जाणून खरोखरच पत्नी या नांवास शोभण्याजोग्या—'कार्येषु मन्त्री वचनेषु दासी । भोज्येषु माता शयनेषु रंभा ॥ धर्मानुकूला क्षमया धरित्री । गुणैश्च भार्याः कुलमुद्धरन्ति ॥ १ ॥'—अशा होतील. त्यांस केवळ पशूहूनही अज्ञान व कैद्यांहूनही जास्त प्रखर तापांत बंदिवान करून ठेवून त्यांच्या ठिकाणीं स्त्रीधर्माचीं लक्षणें असावीं असें कसें बरें आपण इच्छावें? कोणत्याही वृक्षाची योग्य दागदुजी न करितां तो भर उन्हांत नेऊन ठेवणें आणि मूर्खपणानें त्यापासून चांगलीं सोज्वळ फळें इच्छिणें, किंवा वांझेपासून संततीच्या आकांक्षा पोटीं बाळगणें, ह्यां सारखेंच हें होय; ह्मणून ज्यास आपली स्त्री पतिव्रता असावी असें वाटतें त्यानें अगोदर आपण स्त्रीव्रत धारण केलें पाहिजे. आपण

सचोटीनें ह्मणजे खरेपणानें वागल्याशिवाय दुसरा तसा वागणारच नाहीं, व अशा आपल्या खऱ्या वागण्यानें लबाडही आपणापाशीं खरेपणानें वागूं लागतात. पण प्रस्तुतची स्थिति साधारणपणें सर्वत्र अशी दृष्टीस पडते कीं शास्त्र किंवा ज्ञान हीं एकीकडेस राहून अंधपरंपराचालींचेंच प्राबल्य माजलें आहे, ही केवळ देखतभुलीच होय !

## स्वहितसंबंधी स्वानुभविक परिणाम.

याकरितां एकदां मात्र ह्या सदाचरणाच्या संवयी दृढ लावाव्या, असा केवळ प्रघातच घातला पाहिजे ह्मणजे आपणास आपोआप अनीतीचा आणि असत्याचा अंतःकरण-पूर्वक तिटकारा उत्पन्न होऊन आपली सुमतिच होते, सर्व कांहीं खरें खोटें वेगवेगळें सूक्ष्मरीत्या स्पष्टपणें कळूं लागतें. नाहींतर प्रथमतः कोणता तरी टपका, आरोप किंवा शिक्षा टाळण्यास्तव ह्मणून अगर कोणतीही वस्तु मिळविण्याच्या लालचीनें जर कां एकदां खोटें बोललों तर हळू हळू तीच संवय लागून कुमति होते. मग आपले कितीही मोठे अपराध झाले तरी आपणांत खऱ्या खोट्याचा विचार न राहिल्यामुळें आणि खऱ्याचा पूर्वीच असा अनादर केल्यामुळें आपला सर्व वर्तनक्रम ह्मणजे बोलणें, चालणें, वागणें, सर्व क्रिया दुष्टच होतात. मग अशांस मनमिळाऊपणानें चार उपदेशपर कल्याणाच्या गोष्टी सांगणें हेंही भयंकर आहे. कारण ह्मटलेंच आहे, '**उपदेशोहि मूर्खाणां प्रकोपाय न शान्तये । पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्द्धनम् ॥ १ ॥**' सर्पाला प्यायाला दुग्धामृत जरी घातलें तरी विषच मात्र वाढतें. ह्मणून अगोदरपासूनच अशा दुर्वर्तनाच्या खळग्यांत न पडण्याविषयीं सावधगिरी ठेवावी.

सत्कर्माची आवड, दुष्कर्माविषयीं यत्किंचित्ही मोह पडूं न देतां मनोनिग्रहानें त्याचा द्वेष करून दूर राहणें, हें काम साधारण नव्हे. प्रयत्नान्तींच हा परमेश्वररूप सद्धर्म–सद्वर्तनक्रम–साधणार. जसें ह्मटलेंच आहे ' यथाकालकृतोद्योगात्कृषिः फलवती भवेत् ॥ तद्वन्नीतिरियं देव चिरात्फलति न क्षणात् ' इतर सर्वांनीं, स्त्री, पुत्र, आप्त, मित्रादिकांनीं जसें आपणापाशीं शुद्ध खरेपणानें व प्रीतीनें वागावें असें आपणास वाटतें तसेंच आपण त्यांच्याशीं वागलें पाहिजे, तरच आपण मनुष्यें. कारण मनुष्यपणा दिसून येण्याचें जें काय प्रथम लक्षण तें हेंच होय. कांहींही होवो, कसाही काळ येवो, कशीही स्थिति असो, एकदां लहानपणापासून ज्यास सत्याची पूर्ण गोडी लागली आहे, त्याच्या मात्र अंगीं सदाचरण भिंवण्यास उशीर लागणार नाहीं. सर्व जगाचें बहुमत जरी खोटें असलें तरी ' चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता ' याप्रमाणें अशा सत्पुरुषांचा कायिक, वाचिक किंवा मानसिक वर्तनक्रम त्यांच्या मानेवर तलवार जरी ठेविली तरी सत्यास सोडून कधींही अणुमात्र ढळणार नाहीं. कारण ' न निश्चितार्थाद्विरमन्ति धीराः.' सुयुक्तिक असून लोकरिवाजव्यवहारबाह्य जरी तो असला तरी त्याची त्यास परवा नसते. त्याचा कोणत्याही प्रकारें छळ जरी केला तरी तो नीतिमार्ग सोडितच नाहीं. त्यास पक्कें उमजलें असतें कीं एकदा सत्यास अनुसरून वागत असलें ह्मणजे परमेश्वरीं प्रेम व योग्य भीति, आणि आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा सुविचार, यांत बरोबर टापास टिप मेळ पडतो. असा बिनचूक ताळा मिळाल्यानें त्यांच्या अंतःकरणवृत्तींत आनंद व संतोष निर्भयपणें वास करितात. हें समा-

धान ही एक अमूल्य चीज आहे. इची खरेदी तशासच करितां येईल. तसा ह्मणजे ज्या कोणाच्या अंगीं सदाचरणयुक्त सुशिक्षणामुळें स्वातंत्र्य ह्मणजे स्वावलंबन आणि सौम्यता किंवा लीनता यांचें स्वरूप पूर्णपणें वठलें आहे तो. ही गोष्ट काय साधारण नव्हे; पण सुखसाध्यही करितां येते. मात्र हातवटी ठाऊक असली पाहिजे. 'पुराणमित्येव न साधु सर्वं । न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ॥ सन्तः परीक्ष्याऽन्यतरद्भजन्ते । मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ॥ १ ॥ विकार हेतौ सति विक्रियन्ते । येषां न चेतांसि त एव धीराः ॥ यस्मिञ्जीवति जीवन्ति बहवः सोत्र जीवति । वयांसि किं न कुर्वंति चञ्च्वा स्वोदरपूरणम् ॥२॥ उपकारिषु यः साधुः साधुत्वे तस्य कोगुण । अपकारिषु यः साधुः स साधुः सद्भिरुच्यते ॥' इत्यादि सत्पुरुषांचीं लक्षणें सर्व जगजाहीरच आहेत. '*विनाप्यर्थै र्वीरः स्पृशति बहुमानोन्नतिपदं । समायुक्तोप्यर्थैः परिभवपदं याति कृपणः ॥ स्वभावादुद्भूतां गुणसमुदयावाप्ति विषयां । द्युतिं सैहीं किं श्वा धृत कनकमालोपि लभते ॥ १ ॥ असो.

---

* याचसारखी इंग्रजींतही मनाच्या थोरपणाच्या महत्वावर एक सुंदर कविता आहे.

"Mylo, forbear to call him blest,
Who only boasts a large estate;
Should all the treasures of the West
Meet and conspire to make him great,
Should a broad stream with golden sands
Through all his meadows roll;
He's but a wretch with all his lands,
Who wears a narrow soul.
Were I so tall as reach the pole,
Or grasp the ocean in my span,
I should be measured by the soul:
The mind's the standard of the man."

आतां वरील स्वावलंबन आणि लीनता ह्मणजे काय तें सांगून आटोपतें घेऊं. स्वावलंबन ह्मणजे दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याच्या नीच मार्गाच्या वाटेस न जातां आपल्याच हाडांचीं काडें करून आपल्या निढळाच्या घामानें स्वतःच्याच परिश्रमानें कोणतेंही काम एकदां विचारानें हातीं घेतलें ह्मणजे तें आपलेंच असें समजून करून तडीस नेणें; आणि लीनता ह्मणजे आपण कितीही उच्च किंवा नीच स्थितींत असलों तरी, किंवा आपल्यावर दुसऱ्याचे कसेही यत्किंचित् क्षुल्लक जरी उपकार झालेले असले तरी ते स्मरून कृतज्ञतापूर्वक सदा परोपकारशील असणें, आणि मनुष्य दोषार्ह आहे हें जाणून उगीच खोटा स्वाभिमान न बाळगणें व कोणाच्याही मनास किंवा जिव्हाळ्यास लागेल असा व्यवसाय न करणें, हें होय. असे सदाचरणी पुरुष पूर्वींच जाणतात कीं एकदां खोट्या गोष्टीवर पाऊल पडलें कीं पाय भाजणारच. मग एकाच लबाडीच्या वाऱ्यास गेल्यामुळें ती खरी करून दाखविण्यास आणखी अनेक बनवाट्या लागतात, व अशा रीतीनें ती भागुबाईपणाचे लपंडाव खेळण्याची चटक लागली ह्मणजे मग सन्निपात होऊन आत्मशुद्धि जाते. पुढील दशा नंतर काय होते ती सांगणेंच नलगे. असल्या लुच्च्याच्या खऱ्या बोलण्यावरही कोणी विश्वास ठेवीत नाहीं. पण तोच जर सत्यानुयायी, सत्यसंकल्परूप, सदाचारशील असेल तर सर्वच सुज्ञ लोक त्याच्याशीं प्रसन्न होतील. सत्यामुळेंच सृष्टींतील बहुतेक सर्व व्यवहार सुरळीत चालले आहेत. जग हें विशाल मंदिर आहे. येथें आपणास चार दोन घटका वास्तव्य करणें आहे. तर त्यांत आपण

सर्व ईश्वराच्या प्राण्यांनीं आपापलें काम सख्यस्नेहांत अंतर्साक्षी ज्ञानी अंतःकरणास न बाटवितां खरेपणानें बजावणें हेंच आपलें मुख्य कर्तव्यकर्म होय. कोणी ह्मणतील कीं '**स्वभावो नोपदेशेन शक्यते कर्त्तुमन्यथा**' ह्मणजे मूळस्वभाव जाईना आणि एळकूट राहीना, तर '**अभितप्तमयोपि मार्दवं भजते, कैव कथा शरीरिषु**' ह्मणजे सर्वांत बळकट अशी जी लोखंड धातु तीही तापवून लाल केली ह्मणजे मऊ होऊं शकते मग मनुष्य न वळण्याविषयींची ती काय कथा? ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेवावी. सारांश, सर्व स्वदेशबंधूंनीं आपल्या मुलांबाळांस लिहायावाचायास आणि हिशेब करायास शिकवावेंच व त्यांच्या बुद्धीचा कल ज्या विद्येकडे किंवा कलेकडे दिसून येईल तींतच त्यांस प्रवीण होऊं द्यावें, आणि सर्वांनीं आपलें वर्तन नित्य तपासावें, काय सुधारणा झाली ती पाहावी आणि हे सदाचरण, सुशिक्षण आणि दुराचरण, यांचे सुखप्रद आणि दुःखप्रद परिणामदर्शक विचार आपणांस एकदा माहीत झाल्यावर आपण होईल तितकें करून बरें तेंच प्रीतिपूर्वक निश्चयात्मक बुद्धीनें स्वीकारावें, हेंच आपलें प्रस्तुत कर्त्तव्यकर्म होय.

**एतावज्जन्म साफल्यं देहिनामिह देहिषु ॥**
**प्राणैरर्थैर्धिया वाचा श्रेय एवाचरेत्सदा ॥ १ ॥**

---

# संसारदृष्टि.

——·ooo·——

## भाग २ रा.

'मानस' शहरांत संसारदृष्टी या नांवाचा एक अब्रूदार वृद्ध गृहस्थ राहत असे. त्यास एकंदर पांच मुलगे, व 'सदया' नांवाची एक उपवर मुलगी, अशीं सहा अपत्यें होतीं. त्यांतील पहिले चार मुलगे मोठे होऊन पृथक् पृथक् स्वतंत्र धंदे करीत असत. त्यांचीं नांवें अनुक्रमें 'ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र,' अशीं होतीं, व सर्वांत कनिष्ठ मुलाचें नांव धोंडू असें होतें. हा लहानपणींच बुद्धिमान् व चतुर असल्यामुळें सर्वांस फारच प्रिय असे. यावेळीं त्याचें वय सुमारें आठ नऊ वर्षांचें होतें. हा पूर्वी एका मराठी गांवठी पाठशाळेंत जात असे. तेथें चार पांच इयत्तांपर्यंत शिकून नुकताच एका इंग्रजी शाळेंत जाऊं लागला होता. तो एके दिवशीं नेहमींप्रमाणें रात्रौ जेवणानंतर बापाजवळ येऊन बसला असतां बापास चिंताग्रस्त पाहून सहज विचारूं लागला. बाबा, आपलें मन कोणत्या विचारांत गढून गेलें आहे हो? असें त्यानें एक दोन वेळां बापास विचारलें, परंतु बाबाच्या तोंडावाटे चकार शब्दही निघेना, असें पाहून खिन्न होऊन आपण उठून बापाच्या मांडीवर बसून त्यास घट्ट मिठी मारून सद्गदित होऊन स्फुंदत स्फुंदत रडूं लागला. इतक्यांत तावडतोब 'संसारदृष्टीच्या' अंत:करणांतील सर्व विचार एकदम नाहींसे झाले आणि पाहतो तों आपला सर्वांत लहान लाडका मुलगा धोंडू हा एकाएकीं फारच रडत

आहे. तेव्हां त्यास मोठा गहिंवर येऊन धोंडूस पोटाशीं धरून ह्मणाला, " बाळा, कां रडतोस? तुला काय हवें ? तुला काय झालें ? कोणीं तुला मारलें किंवा बोललें कीं काय ? बोल बोल, काय झालें तें सांग, उगीच रडूं नकोस." हे बाबाचे कनवाळूपणाचे मधुर शब्द ऐकून धोंडू ह्मणाला, " बाबा, कांहीं नाहीं हो, कांहीं नाहीं. मला कांहीं नको. मला कांहीं कोणी बोललें नाहीं किंवा मारलें नाहीं."

बाबा—तर मग इतका तुझा कंठ तरी कां भरून आला?

धोंडू—काय विचारतां बाबा, मी तुह्मांकडे नेहमींप्रमाणें आलों, पण पाहतों तर तुमची अपूर्व मानसिक स्थिति झाली आहे. तेव्हां तुह्मांस असे चिंताक्रांत पाहून मला रडूं कोसळलें. त्याला मी काय करूं ? पहा, कोण जाणें, कशी माझी छाती अद्याप धडधडत आहे ती ! तर अगोदर मला सांगा तुह्मीं कोणत्या गोष्टीच्या विचारांत होतां तें.

बाबा—अँ: ! इतकेंच ना वेड्या, याकरितां का तूं इतका रडत होतास ? अरे, या वर्षीं आपल्या सदयेचें लग्न करावयाचें आहे, तेव्हां मी त्या विचारांत होतों.

धोंडू—तर मग, यांत तो बाबा विचार काय करायाचा ? चांगलासा सुशिक्षित वर पाहिला ह्मणजे झालें. आणखी तें काय ?

बाबा—मीं तुला वेडा ह्मटलें तें उगीच नाहीं. तुझ्या मतें जरी तूं शाहाणा आहेस तरी अद्याप तुझी केवळ बालबुद्धिच आहे. पाहा कशी ती. अरे, तुला लग्न ह्मणजे काय तें मुळींच माहीत नाहीं. तुला व्यावहारिक ज्ञान कांहींच नाहीं, ह्मणून उगीच पोरकट बोल बोललास. बो-

लाव तुझ्या इतर भावंडांस. [तीं सर्व आल्यावर] आतां मी तुह्मांस थोडक्यांतच हें लग्नाचें कार्य निर्विघ्नपणें उरकण्यास माझें कर्त्तव्य काय आहे तें सांगतों. असेंच वर्तन देशसुधारणा इच्छिणारांचेंही असलें पाहिजे. पाहा बरें, ज्या अर्थी या लग्नांत मी यजमान आहें व सर्व कुटुंबाचें ओझें माझ्या माथ्यावर आहे त्याअर्थी सर्व कांहीं मला पाहिलें पाहिजे. एक तर माझें मन या कार्यसिध्द्यर्थ बरेंच उदार असलें पाहिजे व असेच थोरमनाचे पुरुष ह्या कामीं मला जितके कारभारी मिळतील तितके पाहिले पाहिजेत. माझें व तसेंच माझ्या ह्या निरनिराळ्या मुनीमांचें आचरण आणि वर्तन शुद्ध व सौम्य असलें पाहिजे, व मला त्यांस आवडेल तेंच, योग्य, व त्यांजकडून होण्याजोगें, असेंच काम करण्यास त्यांस सांगितलें पाहिजे. त्यांजवर सूक्ष्म देखरेख ठेविली पाहिजे. घरांत नानाप्रकारचीं पुष्कळ ठिकाणचीं हरएक स्वभावाचीं अनेक मनुष्यें येणार, त्याअर्थी त्यांच्याशीं मनमिळाऊपणानें वागून जेणेंकरून समाधानपणानें कार्यसिद्धि शीघ्र होईल तें पाहिलें पाहिजे. मला सर्वांशीं गोड व समर्पक भाषण केलें पाहिजे. प्रसंगीं जमलेल्यांपैकीं कित्येक मनुष्यांचा राग सहन केला पाहिजे. कित्येकांचें रुसणें, फुगणें पाहिलें पाहिजे. कित्येकांची तब्यत राखिली पाहिजे. कित्येक दुर्व्यसनी, लोभी, आपलपोटे, भोजनभाऊ, गर्विष्ठ, अज्ञान, मूर्ख, मिजाशी, असे असतील, त्यांची योग्य बरदास्त ठेवून मान राखून कोणाच्याही दुर्गुणांचा तिरस्कार व हेळणा न करितां सर्व अन्याय मीच पोटीं घातले पाहिजेत. कोणाच्या उद्धटपणाबद्दलही कुरकुर किंवा उथळ अगर हलकट स्वभावाचा

ग्रंथ संग्रहालय ठाणे

उपहास किंवा निंदा करितां कामानये. इतकेंच नव्हे, तर, त्यांविषयीं तोंडावाटे ब्रः ही काढितां कामानये व शारीरिक अथवा मानसिक अंतर्भावनानिदर्शक चर्याही दाखविता कामानये. कोणासही मुळींच नांव ठेवितां कामानये. कारण तेणें-करून त्यांचें मन नाखुष होऊन वैर, तंटे उपस्थित होतीलच होतील. गरिबगुरीवांशीं तर फारच नम्रपणानें वागलें पाहिजे, तरच आपला मोठेपणा राहणार आहे. आपण स्वतः कोणत्याही गोष्टीविषयीं दुराग्रह करितां कामा नये किंवा हट्ट धरितां नये. परंतु दुसऱ्याचें आग्रहपूर्वक झालेलें बोलणें शांतपणें ऐकून '**सबका सुनना, दिलका है सो करना**' या म्हणीप्रमाणें सर्व कांहीं तजवीज योग्य विचारानें केली पाहिजे. कोणाचीही चूक त्याच्या पदरीं घालायाची असल्यास ती स्पष्टपणें न्याय्या '**चूक आहे**' असें ठरवून नंतर तिची सवडीप्रमाणें तावडतोब दुरुस्ती केली पाहिजे. सारांश, सर्वांचा भलेपणा मिळविण्यास मीच स्वतः निरभिमान, निर्लोभ, विचारशील, व शाहणा, असा असलों पाहिजे व फारच मनमिळाऊपणानें वागलें पाहिजे. ह्मणून आतां प्रथम या सर्व सद्गुणांचा सांठा मजपाशीं आहे, किंवा कसें काय, त्या विचारांत मी गुंग झालों होतों. कोणतीही उणीव असल्यास पुढील अगत्याच्या गोष्टींची पूर्वींच तजवीज करून ठेविली पाहिजे. नाहींपेक्षां तहान लागेल तेव्हांच विहीर खणेन ह्मटल्यास, अशा असावधपणामुळें तृषार्त्तास योग्यवेळीं पाणी न मिळून पाणी पाणी ह्मणून मात्र हाका मारतां मारतां प्राणास मुकावें लागेल. आतां समजलेत का ? ह्मणून ही एवढी गडबड !

असेंच नानाप्रकारच्या खर्चाच्या बाबतींतही योग्य

लक्ष पुरविलें पाहिजे. खर्च करणें तो शक्त्यनुसारच केला पाहिजे. या खर्चाच्या काटकसरीविषयीं व तशींच सर्वअंशीं आपणांस इहामुत्र कल्याणपर अशीं कांहीं वचनें पूर्वील महान् विद्वान् व शाहण्या पुरुषांनीं करून ठेविलीं आहेत, तीं तुह्मीं पक्कीं लक्षांत ठेवावीं ह्मणून तुह्मांस सांगतों. मनाचे कान उघडून मात्र ऐकाहो. तीं हीं 'अमृततुल्य वचनें':—

१ (अ) फुशारकीसाठीं खर्च करणें, ह्या पोकळ डौलें भीक मागणें. (ब) ऋण काढून सण करूं नये.

२ लहान खर्च न ह्मणावे थोडे, लहानही भोंकानें तारूं बुडे.

३ आदायापेक्षां कमी, खर्च असूदे नेहमी.

४ ज्या वस्तूची आपणास फारच निकड नाहीं, ती वस्तु निरर्थक स्वल्पांतही स्वस्त मिळत आहे ह्मणून विकत घेतली असतां ती आणि आपल्या जरूरीच्या व प्रिय अशा इतर वस्तु तिचें ऋण फेडण्यांतच आपल्याकडच्या जातात.

५ (अ) †एकपट वांचवितो; त्यास दुप्पट लाभ

---

† यावरून असेंही स्पष्ट सिद्ध होतें कीं 'एकपट व्यर्थ खर्च, हा दुप्पट तोटा वर्ज्य,' कारण पाहा बरें, आज जर आपला एक आणा व्यर्थ ह्मणजे जरूर नाहीं ती वस्तु विकत घेण्यांत आपण खर्च केला तर हा एक आणा व्यर्थ गेला तो गेलाच, पण तोच असता तर दुसऱ्या वेळीं योग्य निकडीची वस्तु विकत घेण्याकरितां जो आणखी एक पदरचा खर्चावा लागला त्याऐवजीं उपयोगीं पडला असता, तोही नाहींसा झाला, अशीच वेळाचीही गणना आणि महत्व जाणलें पाहिजे. ह्मणूनच ह्मटलें आहे कीं 'क्षणशः कणशश्चैव विद्यां वित्तं च साधयेत्। क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम् ॥ १ ॥'

होतो. (ब) उसनें* देतो किंवा परत मागतो, तो भीडे-भाडेंत फजितीच मिळवितो.

६ आळस, कैफ, दिवाळखोरी, चोरी, चहाडी, कपट, लबाडी, इत्यादि दुर्व्यसनें; एणें जीवितासही नागवणें.

७ आपणच स्वतः सदाचरणानें वागणें; एणेंच दुसऱ्यास सुधारणें.

८ योग्य वेळीं योग्य कामकाज एकदां हातांत घेतलें असतां त्यांत कितीही संकटें किंवा विघ्नें उपस्थित झालीं तरी शांतपणानें आणि धैर्यानें त्या सर्वांसही टक्कर मारून तें सिद्धीस न्यावें.

९ ज्यावेळचें काम त्यावेळेसच तिळभरही विलंब न लावितां योग्य विचारें करावें.

१० लवकर निजे, लवकर उठे; विद्या, धन, सुख त्या लिगटे.

११ यथाशक्ति निष्काम परोपकार; हेंचि सदाचरणाचें बीज साचार.

१२ प्रपंचीं सुखार्थ आरोग्य, सदुद्योग, वित्त; परमार्थीं केवळ शुद्ध चित्त.

१३ मनाचे कल्पना व्यापार चंचळ; जीवा हेच विषय बुडविती केवळ.'

१४ निश्चयाचें बळ; तुका ह्मणे तेंचि फळ.

१५ आत्मनिवेदन भक्ति; एणेंचि साधे सत्सुखप्राप्ति.'

---

*वस्तुतः उसनें देणाराचें, मागणाराचें व घेणाराचें, तिघांचेंही जिणें सारखेंच लाजिरवाणें आहे.

आतां तुह्मी समजलांना? सर्व सुखाचें बीज कशांत आहे तें.

मुलगे-होय, बाबा, स्वतःचें निरपेक्ष सदाचरण आणि सत्य ज्ञानार्थ एकसारखा सतत दृढ निश्चयात्मक उद्योग, यांतच तें आहे.

सं०—परंतु ध्यानांत आलें का, कोणत्या कोणत्या गोष्टी इहपर आवश्यक आहेत त्या? नाहींतर आणखी एकदां त्यांचा सारांश किंचित् सविस्तर सांगतों. पण लक्षपूर्वक मात्र ऐकिलें पाहिजेहो. तुह्मांस हिंदुस्थानचा इतिहास ठाऊक आहेच. त्यावरून ह्या माझ्या पुढील सांगण्याचें बहुतेक इंगित आणि अभिप्राय तुमच्या लक्षांत सहज येईल. तुह्मांस या देशाची प्राचीन व सांप्रतची स्थिति माहित आहेच. पाहा, आपला हा हिंदुस्थान देश कसा संपत्तिमान् व थोर मनाच्या पुष्कळ सुज्ञ जनांनीं भूषित होता! असें असतां आतां त्याची दशा अशी दीन व दुर्बळ व्हायाची होती, हें त्यवेळीं कोणाच्या स्वप्नींतरी आलें होतें का? पण काय सांगावी कालचक्राची गति! प्रत्यक्ष जें सर्व सुखसंपन्न रामराज्य होतें, त्याचीच ही अशी निकृष्टावस्था झाली आहे. याचें कारण जसजशीं त्या पूर्वींच्या उदार, दूरदर्शी, विचारशील लोकांची संख्या कमी झाली, तसतशी या देशास मोडती कळाच लागली. पाहा, पूर्वीं प्रथमतः जातिभेद तर मुळींच नव्हता, हें आपणास पुराण इतिहासावरून कळतें. नंतर वर्णाश्रमधर्मसंस्थापना झाली, ती तरी तशीच सुरळीत चालावयाची होती? पण तीच तरी कशी टिकेल? ज्या शुद्ध हेतूनें ती केली होती, तो एकीकडेसच राहून तेणेंकरून अनेक जाती निष्पन्न

झाल्या. व अशामुळें एकोपा ह्मणजे सर्वांचें जें एक मन—स्वदेशबंधुप्रीतीची जूट—होतें तें दिवसेंदिवस वितुष्ट होऊन आतां सर्वांचाच पूर्णनाश व्हायाची वेळ आली आहे. ती पाहा कशी ती. पूर्वी जातिभेद प्रथमच झाला तेव्हां किंवा तो होण्याच्यापूर्वींही आपण सर्व हिंदुलोक एका प्रकारच्या स्वदेशबंधुप्रीतीच्या आणि अभिमानाच्या नात्यानें एका कटानें वागत होतों; आणि आतां आह्मांतच हजारों जातिभेद झाल्यामुळें आपणच आपला एकदेशीय स्वदेशभक्तिसंबंधही सोडून वेगवेगळ्या विविधजातीय संबंधास लिगटून बसलों आहों; इतकेंच नव्हे, तर स्वहिताचा विचार व अनुभव, याविषयीं शून्य असल्यामुळें आपल्याच गर्वानें व दुष्ट स्वभावानें आपस्वार्थी, फितूर, कज्जेदलाल आणि तिरसट होऊन एकटेच मरत आहों,आणि येणेंकरून इतरांसही दुःख देत आहों; आणि अशा रीतीनें ती जी बारीक खऱ्या, पण पुष्कळच काड्यांची एक जूट ह्मणजे जोडी एकत्र मजबूत होती ती निरनिराळी होतांच विसंगतपणामुळें एक एक काठी आतां हवी त्यास सहज मोडतां येते, असें झालें आहे. काय हा अनर्थ! कित्येक निराश होऊन ह्मणतात कीं, हा वेळेचाच गुण! पण आपणच आपलें नाक कापून आपणासच अपशकून केला, याविषयीं मात्र कोणी कांहींच विचार करीत नाहींत. अझून डोळे उघडीतच नाहींत. हाय, हाय! काय सांगूं! ह्या गोष्टींचा विचार केला ह्मणजे दुःखाचे उमाळे येतात आणि आंगावर कांटा उभा राहतो.

मग आह्मी अशा हलकट, पोरकट स्वभावाचे झाल्यामुळें दुर्बळ झालों आणि परकीय लोकांनीं सहज हां हां ह्मणतां

आपला अंमल जागोजाग बसविला. त्यांच्या संसर्गामुळें मात्र आणखी कांहीं अडाणी अज्ञानमूलक रीतिभाति आह्मांत सुरू झाल्या. आपली ऐपत न पाहतां कर्ज काढून बालविवाह करणें, स्त्रियांस अज्ञान व कोंडून ठेवणें, वांटणी, विभक्तपणा, वेगळेचार करून तोन्यानें दुष्टभाव वाढविणें, आपण ऐषआरामांत यथेच्छ धुंद होणें, असे गुलहंसी होऊन कर्जबाजारी झालों, तरी या भ्रमाच्या घमेंडींतच असणें, इत्यादि अनेक मूर्ख समजुती धर्मरूढीरूपानें आह्मांत शिरल्या. मग हळुहळु सर्व दुर्गुणांचा पाया असत्य, हेवा, मत्सर, आळस, कैफ, व भित्रेपणा, हीं आह्मांत वास करूं लागलीं. एकाचें बरें दुसऱ्याच्यानें पाहवेना, अशी विलक्षण स्थिति झाली. मग काय विचारतां, पूर्वीच्या बऱ्या चाली--मुलांस व मुलींस लहानपणीं योग्य शिक्षण देणें, सदाचरणोपदेश करून लहानपणापासूनच अंतर्बाह्य सद्वर्तनाच्या त्यांस संवयी लावणें--इत्यादि अनेक बऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष होऊन विद्येचा, शास्त्रांचा, कलाकौशल्यांचा जेव्हांचा तेव्हांच लोप होत गेला. श्रेष्ठ जातींतील लोकांनींच सर्व विद्याशिक्षणसंबंधी हक्क घेऊन आपलें वर्चस्व फार माजविलें. परंतु इतर क्षत्रिय व वैश्यांसही द्रव्यलोभास्तव आपणाकडून शिकण्याचा कांहीं थोडासा अधिकार दिला. पण काय सांगावी त्या शूद्रलोकांची आणि स्त्रियांची केवळ परतंत्र स्थिति! पशूंस तरी बरें वागवावें. पण यांना एखादा ग्रंथ ऐकण्यासही मनाई! ह्मणूनच हो, त्या अशा आलीकडील बनलेल्या वर्णाश्रमामुळें ऐक्यमनोभावविचाराचें सर्व पारडें उलथून पडलें आणि हीं अशी दशा झाली. परंतु आश्चर्य तें हेंच कीं,--तेच बहुतेक धर्मवेडे श्रे

छन्नार्नीतील लोक केवळ द्रव्यलोभास्तव शूद्रांहूनही नीच ज्यांस समजतात अशा म्लेंच्छ यवनादिकांसही भागवत, वेदादिक ग्रंथ अद्याप शिकवितात, हें आपण प्रत्यक्ष डोळ्यांपुढें पाहातों ! ! !

तसेंच देवाच्या भक्तिविषयींही धर्मसंबंधाचीं थोतांडें त्यांनीं अनेक रचिलीं. खऱ्या देवास तर विसरून कल्पनेंतच काम्यनिषिद्धकर्मान्तर्गत अनंत देव ( ३३ कोटी ) निर्माण करून हें एक बंडच माजविलें. येथें एकपट दानधर्मादि केल्यानें पुढें दसपट मिळेल, या मिषानें सर्वांस शास्त्रमोहांत घातलें. वेदशास्त्र पुराणादिकांचा या गोंधळामुळें विपरीतच अर्थ केला. अशानें या आशाबद्ध काम्य कर्म करण्यांतच निषिद्ध होतें ह्मणजे पुण्य ह्मणून करायास इच्छावें तों तेंही पापच होतें. काय हा या मायेचा अनर्थ! असा हा सर्व व्यूह रचला जाऊन सर्व अंशीं जनास भ्रमांत टाकून वेड लावलें. अरेरे! काय ही दुर्बुद्धि व काय हें दुर्दैव!! सर्व गोष्टींचा मूळचा सूक्ष्म अंतर्गत खरा हेतु कोणासच माहीत नाहींसा झाला, हाय! हाय! किती दुःखाची गोष्ट बरें !! हरहर !!! सर्वच ब्रह्मघोटाळा झाला!!! ह्मणूनच हो ही अन्नान्नगतता मागें लागली आहे.

मग काय पुसायाचें. आह्मीं जी मोठी बळकट देशसुधारणेची टोलेजंग इमारत उभारली होती, ती पायाकडूनच मोडत चालली. ही पहा कोसळत कोसळत या दशेस येऊन पोहोंचली आहे. ही इमारत आतां पुनः बांधली जाण्यास नको का आपण त्या आपल्या पूर्वजांप्रमाणें अमूल्य सद्गुणांनीं मंडित असलें पाहिजे ?

ह्मटलेंच आहे. **परिभ्रमति संसारे मृतः को वा न**

जायते । स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम्॥१॥ तर त्या सर्व सद्गुणांचा वास आह्मांत होणें हें फारच आवश्यक आहे. त्या वेळचे पुष्कळ लोक विद्वान्, सदाचारसंपन्न, धार्मिक, नीतिमान्, लीन, दिलदार, एकनिष्ठ, निरपेक्ष, धैर्याचे केवळ खंबीर, शौर्याचे निधडे, दक्ष, विश्वासू, क्षमावान्, शांत, सत्यव्रतधारी, दयाळू, मनःसंयमी, समयोचित बोलणारे व वागणारे, युक्तिवान्, दूरदर्शी, सुधारणुकेच्या कामांत '**प्रयत्नांतीं परमेश्वर**' हें जाणून दृढनिश्चयानें योग्य परिश्रम व सतत अस्खलित उद्योग करणारे, कुशाग्र व खोल बुद्धीचे, सहनशील, मूर्खांचें मूर्खपण व वेड्या अज्ञान मतवादी लोकांचा कमी समज व भ्रांति सदोष आणि निराधार आहेत असें स्पष्ट सिद्ध करून त्यांस त्यांच्याच कलानें लीनतेनें आणि मनमिळाऊपणानें खऱ्या गहन विषयांचा अर्थ मनांत भरवून देऊन समजावून शहाणे करणारे, योग्य विचारानें योग्य वेळीं एकच पण योग्य असें काम हातीं घेऊन तेंच एकसारखें शांतपणानें योग्य वेळांतच सिद्धीस नेणारे, यःकश्चित् क्षुल्लक गोष्टींपासूनही कांहीं तरी योग्य सद्गुणांचें उदाहरण घेऊन दिवसेंदिवस अधिक शहाणे होणारे, ऐतिहासिक गोष्टींवरून आपल्या मागील ह्मणजे पूर्वीच्या लोकांस ज्या कांहीं प्रसंगानुसार अचाट संकटांच्या आणि विपत्तीच्या ठेंचा लागल्या त्या जाणून आपण इशारत घेऊन शहाणे झालेले, अपकाऱ्यांवर तर अगोदर उपकार करणारे, प्रामाणिक, धोरणी; खोटसाळपणा, आळस, अतिनिद्रा, कैफ, इत्यादि सहज जडणाऱ्या दुर्व्यसनांच्या संवयी, ह्या केवळ नागविणारे मोहक, जणूं काय, लालूच दाखवून केंसानें गळा कापणारे हितशत्रु

आहेत असें अंतःकरणपूर्वक मानणारे, अशा सचोटीचे, फार काय सांगावें खऱ्या निव्वळ शंभर नंबरी सोन्याच्या कसास उतरलेले असे सुशील होते. एकंदरींत काय सांगावी त्यांची बोलण्याचालण्याची शैली! त्यांना आपल्या परोपकारबुद्धिकार्यक्रमांत पुष्कळ संकटें सोसावीं लागत, द्रव्यद्वारा, शरीरद्वारा, वरीच यस सोसावी लागे. मोठमोठे ध्यानीं मनीं स्वप्नींही येत नाहींत असे महान् दुर्घट प्रसंग त्यांजवर येऊन ओढवत असत, पण काय विचारतां त्यांची छाती! येणेंकरून त्यांचें धैर्य किमपिही न खचतां उलटी त्यांची उमेद व ईर्षा वाढत असे. ह्मणूनच त्यावेळेस त्यांची कडी सर्वांवर चढत असे. कारण विचारशीलता आणि दृढनिश्चय. ह्या सर्व गोष्टी जगजाहीर आहेत. पण आमचे ह्मणून कान डोळे उघडतच नाहींत. काय हें दुर्भाग्य! केवळ अज्ञानाची निशाच!! सिंहाच्या पोटीं कोल्हे निपजले, हेंही ह्मणणें शोभत नाहीं. कारण कोल्ह्यांच्या अंगीं स्वहिताचा तरी धूर्तपणा असतो! पण हे आपले लोक '**कसें करूं काय करूं**' या अष्टाक्षरी मंत्राचा जप करण्यांतच मतिभ्रष्ट होतात. नाहींतका कोणी यांत खऱ्या मायेचे (आईचे) पूत (मुलगे)!!! आहेत; ह्मणूनच आपणास ही कांहीं किंचित् स्वतंत्रता भोगतां येते.

तर आतां आपण या हिंदुस्थान देशांत जन्मलों, ह्मणून आह्मांस त्याचा योग्य अभिमान असणें हें अगत्याचें असून स्वाभाविक व रास्त आहे. तर येथें जन्मास आल्याचें सार्थक्य करणें आपणास असल्यास हे पूर्वीं सांगितलेले सर्व आपल्या पूर्वजांचे सद्गुण आपल्या अंगीं वसणें आवश्यक आहे, व मला जसें या लग्नकार्यसिद्धयर्थ वरील वि-

चारांप्रमाणें वागलें पाहिजे, तसेंच, किंबहुना आणखी विशेष तोटा सोसूनही ज्यांस हें सार्थक्य करणें वाटेल त्यांनीं हा देशोन्नतीचा उद्योग तसा एकसारखा चालविला पाहिजे. नाहींतर 'नाहीं तरी काय थोडीं, श्वान शुकरें बापुडीं' याप्रमाणें कुत्रें, मांजरें का थोडीं जन्मास येतात, खातात, पितात आणि मरतात. त्यांचीही योग्यता आह्मांस साजत नाहीं. कारण तीं जनावरें जात्या अज्ञान असूनही ज्या धन्याची रोटी किंवा मीठभाकर खातात त्यास विपत्काळीं-ही न सोडितां शक्त्यनुसार सन्मित्रवत् त्याच्या उपयोगीं पडतात.

पाहा ही आपली आर्यभूमी हिंदुस्थान देश! आपण कितीही निमकहराम झालों तरी अद्याप कशी आईप्रमाणें सुप्रसन्न आहे ती! एक गंगायमुना यांच्या तीरांकडीलच प्रदेश आपल्या सर्व लोकांस वर्षभर पुरे इतकें अन्न देऊं शकतो, इतका सुपीक आहे. किती ह्मणून द्रव्य इतर राष्ट्रांच्या लोकांनीं येथून नेलें, पण आपली ही आर्यभूमी आपल्या कृपावलोकनांत कांहीं तरी कमी झाली आहे का? मुळींच नाहीं, पण आमची वर्तणूक व स्थिति पाहूं गेलें असतां खरोखर शोचनीय हो शोचनीय!! दाटून आपण होऊनच हीं दुःखें, ही स्थिति बळें ओढून घेतली आणि आतां रडतों आपल्या नशीबास! यांत नशीब तें कसचें? केल्याकर्माचें फळ भोगिलेंच पाहिजे, उपाय नाहीं. करतांना मात्र बरें वाटतें! ह्मणून 'हांसत कर्म करावें, भोगावें रडत तेंचि परिणामीं' हें जाणून असावें. तसेंच आह्मां मनुष्यांस परमदयाळू आणि न्यायी परमेश्वरानें सर्व गोष्टींचा बरेवाईटपणा विचारानें जाणण्याजोगी बु-

त देणगी–सदसद्विवेकबुद्धि–दिली असतांही आपण तिची डोळेझांक करितों आणि असे विलक्षण वागतों, हा केवढा बरें आपला मूर्खपणा! तसेंच ह्या ऐहिक विषयांतच गुंग होऊन ज्या परमेश्वराच्या सत्तेनें सर्व कांहीं होत आहे त्यास सत्संगतीनें जाणून त्याचें यथाशक्ति यथाकाळीं घटकाभरही सप्रेम स्मरण भजन आपण मुळींच करीत नाहीं, ही केवढी बरें दुःखाची गोष्ट! अहो हें बेइमान नव्हे काय; आपल्या अंतःकरणास याविषयीं कांहींच अनुतापही होत नाहीं!

अनुताप किंवा पश्चात्ताप, हीं तर राहिलींच एकीकडे, पण ह्या कनककामिनीविषयोन्मादामुळें आपण असे कांहीं विषयांध शिश्नोदरपरायण होऊन गेलों आहों कीं, अशी जरी आमची दशा झाली आहे तरीही आह्मी डोळे न उघडतां असा कांहीं आह्मांवर त्या विषयकैफाचा अंमल बसला आहे कीं भ्रमिष्ठ होऊन आपल्या गुंगींतच ह्मणतों–देव कोठें आहे? असता तर दिसता!!! असो. कोणीही बऱ्याविषयीं सदुपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्यास त्यांपासून कल्याणपर कांहीं तरी समज घ्यायाचा सोडून त्याचाच उपहास करण्यास–'परोपदेशवेलायां शिष्टाः सर्वे भवन्ति वै। विस्मरन्तीह शिष्टत्वं स्वकार्ये समुपस्थिते॥'–लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडा पाषाण असें बोलून दाखवून––प्रवृत्त होतों. ह्मणूनच हो ही अशी दशा!!! पाहा आपला देश कसा भुकेबंगाल आणि केवळ कफल्लक झाला आहे! पण आपल्या लोकांचे ह्मणून डोळे उघडतच नाहींत. हाय हाय, काय हा अनर्थ!

ज्या अर्थी आपल्या वर्तनक्रमांत हा मोठा अन्याय आहे,

असें आपल्या सदसद्विवेकबुद्धीसही वाटतें त्या अर्थी त्याबद्दल शिक्षा आपणास चुकेल, असें कसें बरें वाटावें? अहो अग्नीवर न कळूनही जरी पाय पडला तरी फोड यायाला चुकेल का? नाहीं हो नाहीं. याकरितां पूर्वींच सावध राहिलें पाहिजे.

आतां पाहा हे इंग्रज लोक. यांचाही थोडा इतिहास तुह्मांस माहितच आहे. हे पूर्वीं किती रानटी व निंद्य स्थितींत होते बरें? यांनीं शरीर रंगवून नग्न फिरावें, हिरवें मांस मिळालें कीं तसेंच खावें, असा फारच विपरीत आचार ठेविला होता. पण पाहातांना त्यांनींच व्यापाराकरितां ह्मणून हिंदुस्थानांत प्रथम येऊन मनमिळाऊपणानें वागून धूर्तपणानें आणि शहाणपणानें हळू हळू बोटाचा, हाताचा, पायाचा व शेवटीं आपला स्वतःचा शिरकाव करून आतां हा सर्व देश 'बेवकुबाचा माल अक्कलवंताचा खुराक' या प्रमाणें कसा काबीज केला आहे हें? काबीज तर काय, पण त्यांच्या गुणांमुळें त्यांच्या सत्तेचा जोर इतका वाढला आहे कीं आतां त्यांच्या कृपेनेंच आपणास सुरक्षित राहतां येत आहे. याचें कारण काय तें आलें का तुमच्या लक्षांत? मागें लिहिलेल्या आपल्या पूर्वजांच्या आंगच्या सद्गुणांतील कांहीं गुण आतां त्यांच्या बहुतेक लोकांत वसत आहेत, व आपण भ्रमिष्ठ झालों आहों, आमचें हित आह्मांस कळत नाहीं. नाहींपेक्षां ते मनुष्य व आपणही मनुष्यच; पण यांत काय बरें मोठें? सर्वांची संमिलित एकी, उद्योग, ज्ञान व धन. पण तुमच्या ध्यानांत आली का ह्या इंग्रज लोकांच्या एकीच्या साधकबाधक कारणांतही कशी काय अनुकरणीय उत्तम खुबी आहे ती.

पाहा, यांचे घरांतील तंटेबखेडे घरांतच, गावांतील गावांतच समंजसपणानें आपसांत मिटले जातात किंवा जशाचे तसेच गुंडाळून ठेविले जातात. पण स्वदेशाच्या सार्वजनिक कामांत मात्र सर्व जणूं काय एकाच आईच्या पोटांतून सख्खे भाऊ (सहोदर) निपजले आहेत, असे वागतात.. किंबहुना बहुत अंशीं फारच विशेष प्रीतिसंबंध अशा प्रसंगीं यांच्या आंगीं दृष्टीस पडतो. याचें नांव खरा एकदिलपणा व स्वदेशाभिमान. पण आह्मांत पाहायास गेलें तर आणीबाणीच्याही प्रसंगीं सर्वच या विपरीत आढळतें. यास आतां काय बरें ह्मणावें!!! बरें, यांचें राज्य तरी आपणास ह्या आलिकडील आपल्या स्वदेशीय हिंदुराज्यांपेक्षां बरें वाटतें, याचें कारण काय तें समजलानां? आमच्या त्या राजांच्या राज्यव्यवस्थेपेक्षां यांचा बंदोबस्त पुष्कळ अंशीं अधिक चांगला व निर्भय आहे. पण ह्या अशा स्वरक्षणसाधनहीन जिण्यांत आपणांस जितकें सुखानें, स्वस्थ, सुरक्षितपणानें व नामधारी स्वतंत्रपणानें राहतां येत आहे, तितकाचही प्रसंग विशेषीं मोठा दुर्धर धोका आहे, असें कोणाही कोत्या समजुतीच्या मनुष्यास वाटेल किंवा कोणी आशंका घेईल, परंतु ही आशंका केवळ निराधार असून चुकीची आहे. कोणी ह्मणेल, असें साहजिक वाटण्याचें कारण कितीही दयाळू झाले तरी हे राज्यकर्ते बीजदृष्ट्या परकीय देशाभिमानी आहेत, तर अशांनीं 'यथा राजा तथा प्रजा' यांतील गर्भित अर्थ जाणला नाहीं, असेंच ह्मटलें पाहिजे, विचारदृष्ट्या पाहा. ह्या आह्मां चालत्या बोलत्या मनुष्यांत जसें अंतर्गत वृत्तींसह मन प्रधान ह्मणजे मुख्य खरा राजा, आहे, व

जसें तदनुसार आमचें अंतर्बाह्य शरीरद्वारा सद्वर्तन किंवा दुर्वर्तन, चांगुलपणा किंवा दुष्टपणा, दिसून येणारच येणार, तसेंच हें. ज्याप्रमाणें संस्कृत 'अपरोक्ष' व 'परोक्ष' या शब्दांचा मराठी रूढींतील अर्थ त्यांच्या संस्कृत मूळ अर्थाहून केवळ विपरीत ह्मणजे उलटा झाला आहे त्याप्रमाणेंच ह्या वरील संस्कृत ह्मणीचा अर्थ समजावयाचा, 'यथा प्रजा तथा राजा' या मत पुष्ट्यर्थ 'प्रजां संरक्षति नृपः सा वर्द्धयाति पार्थिवम्' असेंही एक वचन आहे. ह्या राज्यकर्त्यांकडे कोणत्याच गोष्टींविषयीं दोष नाहीं. सर्व दोष आमचाच आहे. आपल्या मूर्खपणाविषयीं त्यांस दोष देणें, हें केवळ आपला मूर्खपणा दुप्पट वाढविणें होय. आमच्या योग्यतेनुरूप आह्मांस सर्व कांहीं हक्क दिल्याविना त्यांचें राज्य स्थिर चालणारच नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे ह्मणून ज्या अर्थीं आपणास वाटतें कीं, आपली डाळ कशीही एकदां शिजावी त्याअर्थीं 'अल्पानामपि वस्तूनां *संहतिः कार्यसाधिका ॥ तृणैर्गुणत्वमापन्नैर्बध्यन्ते मत्तदन्तिनः ॥ १ ॥ 'बारीकही गवताच्या काड्यांची एकेरी, उन्मत्तही हत्तीस बांधते दोरी,'— हें जाणून आह्मीं सर्वांनीं मनानें एकत्र मिळून हिम्मत धरून सर्व गोष्टींचा कार्याकार्य विचार करून चतुराईनें आणि शहाणपणानें या आपल्या स्वदेशसुधारणुकेचें सर्व मर्म सूक्ष्मपणें लक्षांत आणून तसें देशकालवर्तमानक्रमास अनुसरून योग्य रीतीनें चाललें पाहिजे आणि आपणच आपला शारीरिक आणि मानासिक वर्तनक्रम झटून झटून अंतःकरणपूर्वक हळू हळू अंतर्बाह्य सुधारला पाहिजे. उगीच

* एकत्रपणा, समूह, एकोपा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

त्यांच्यासारखेंही चालून उपयोग नाहीं. खरासारा विचार केला पाहिजे आणि निर्दोष देशाभिमान बाळगिला पाहिजे. मग 'जलबिन्दु निपातेन क्रमशः पूर्यते घटः' या न्यायाप्रमाणें सहज सर्व कार्यसिद्धि होईल. नाहींपेक्षां वाक्पांडित्यानें कोरड्या स्वदेशाभिमानाचा बाणा दाखवून बाहेरून सभ्यपणाचा थाट घालून अंतरीं दुष्टस्वभावभुजंगास थारा दिल्यास अशा दांभिकपणानें आपणच आपला गळा कापायाला लागूं, याविषयीं खबरदारी ठेविली पाहिजे. कारण अशा दंभानें आणि पोकळ शब्दांच्या वारानें अगोदरच गळ्यास लागलेला फांस ताणला जाऊन आपणच आपला नाश केल्यासारखें होईल, यांत मुळींच संशय नाहीं. मी हें तुह्मांस टक्केटोणपे खाल्ले आहेत ह्मणून अनुभवसिद्ध खरें असें बोलणें सांगत आहें बरें.

जसें शरीर आरोग्य राहण्यास निर्मळ मित आहार विहार जरूर आहे तसेंच मन संतुष्ट राहाण्यास सुविचार व ज्ञान हीं अवश्य आहेत, हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे.

असो, त्या आपल्या पूर्वजांच्या नेकीचे जेव्हां आह्मांत बहुत लोक होतील तेव्हांच खरी सुधारणा आपणांत होण्याचा संभव आहे. तशा थोर मनाच्या लोकांची जितकी संख्या जास्त होईल तितका आपल्या स्वदेशसुधारणा इमारतीचा पाया अधिक मजबूत होईल; ह्मणून तुह्मीं सर्वांनीं हीं चार बोधपर सांगितलेलीं वचनें लक्षांत ठेवून यांचा पूर्ण विचार करा, आणि हा माझा लहानसा कल्याणकारक उपदेश आपल्या मित्रांस आणि देशबांधवांस सांगून त्यांनाही अज्ञानकैफाच्या गुंगींतून शुद्धीवर आणा. त्यांस जरी तुह्मीं जागें केलें तरी ते आपापल्या उद्योगास लागणार नाहींत, कारण त्यांची सुस्ती पुष्कळ दिवसांची असल्यामुळें

एकाएकीं जाणार नाहीं, ह्मणून त्यांस वारंवार गोडीगुलाबीनें आणि समंजसपणानें सांगितलें पाहिजे. इतकें केल्यावरही जर ते डोळे उघडणार नाहींत तर मग शिकस्तच झाली. अशा दिलगिरीचा जो कांहीं विपरीत व भयंकर परिणाम होणार तो हूं किंवा चूं न बोलतां भोगावा लागेलच लागेल. अस्तु, अहो पण आतां किती वाजले? सुमारें अकरा तरी वाजले असावेत.

मुलगे–होय बाबा, हां हां ह्मणतां अकरा वाजून गेले.

बाप–रात्र तर फार झाली, पण ह्या इतक्या वेळाचें तुह्मीं सार्थक्य तरी केलें का? नाहींतर 'नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडून गेलें वारें, 'एका कानानें ऐकिलें आणि तात्कडतोब दुसऱ्या कानानें सोडलें' असें मात्र करूं नका, ह्मणजे झालें. असो, आतां मी तर तुमच्या ऋणांतून मुक्त झालों ह्मणून आतां तुमचा तुह्मींच विचार करायाचा. हा सर्व सांगितलेला बोध प्रपंचांत साधारपणें पुरे इतका आहे, परंतु हवातेव्हां तो तुह्मांस स्मरावा ह्मणून कांहीं संस्कृत श्लोकपर वचनें सांगतों ह्मणजे हा लक्षांत ठेवायास सुलभ पडेल. तुह्मां सर्वांस लहानपणापासून मी सावधगिरीनें थोडें थोडें संस्कृत शिकवीत आलों आहें, तेव्हां आतां यांचा अर्थही समजण्यास तुह्मांस फारसें अवघड जाणार नाहीं. पण चित्त देऊन मात्र ऐका ही नवरत्नमाला.

'नवरत्नमाला' ( भर्तृहरीच्या नीतिशतकांतील )

'ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता शौर्यस्य वाक्संयमो ।
ज्ञानस्यो पशमः श्रुतस्य विनयो वित्तस्य पात्रे व्ययः ॥
अक्रोधस्तपसः क्षमा प्रभवितुर्धर्मस्य निर्व्याजता ।
सर्वेषामपि सर्व कारण मिदं शीलं परं भूषणम् ॥ १ ॥

शांठेपणाचें भूषण, मनमिळाऊपणानें वागणें; शौर्याचें, बडबड न करणें; ज्ञानाचें, यथास्थित क्रिया करणें; विद्येचें, नम्रता; द्रव्याचें, सत्पात्रीं व्यय करणें; तपाचें, शांति; सामर्थ्याचें, क्षमा; आणि धर्माचें, सत्य; हींच. सारांश, उत्तम स्वभाव हा सर्व सद्गुणांचें बीज होय.

एते सत्पुरुषाःपरार्थ घटकाः स्वार्थान्परित्यज्य ये ॥
सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये ॥
तेऽमी मानवराक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नन्ति ये ॥
ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे ॥२॥'

अर्थ-स्वार्थाकडे दृष्टि न ठेवितां जे कोणी दुसऱ्यांचें कार्य करण्यास झटतात, तेच सज्जन होत. आपल्या स्वार्थास विरोध न येत असल्यास, जे कोणी दुसऱ्यांचें काम करण्यास झटतात ते सामान्य. जे आपल्या स्वार्थाकरितां दुसऱ्यांच्या बऱ्यास विघ्न किंवा नाश करितात, ते मनुष्यरूपी राक्षस होत. पण जे निरर्थक कोणाच्या बऱ्यास आडकाठी करितात किंवा त्याचा नाश करितात ते कोण हें आह्मी जाणत नाहीं ह्मणजे त्यांच्यासारखा दुष्ट पदार्थ नाहीं, ह्मणून त्यांचें नांव सुचत नाहीं असें नव्हे, तर तें उच्चारण्यासही आह्मांस लाज वाटते.

दौर्मन्त्र्या न्नृपतिर्विनश्यति यतिः संगात्सुतो लालनात्
विप्रोऽनध्ययनात् कुलं कुतनयाच्छीलं खलोपासनात् ।
ह्रीर्मद्यादनवेक्षणादपि कृषिः स्नेहः प्रवासाश्रयात्
मैत्री चाप्रणयात्समृद्धिरनयात्त्यागात्प्रमादाद्धनम् ॥ ३ ॥

वाईट प्रधानामुळें राजा बुडतो, योगी विषयाभिलाषानें, मुलगा अति लाड केल्यानें, विप्र ह्मणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्या-

दि सर्व मनुष्यें, विद्या नसल्यानें, कूळ वाईट पुत्रामुळें, सुस्वभाव दुर्जनाच्या सेवासंपर्कानें, लाज कैफानें, शेतकी दागदुजी न केल्यानें, स्नेह प्रवासामुळें ह्मणजे कधींच एकमेकांस न पाहिल्यामुळें, मैत्री नम्रता आणि प्रीति नसल्यानें, भाग्य उर्मटपणानें, आणि धन अधर्मकरून अथवा मूर्खपणा इत्यादिकेंकरून, या प्रकारें या या गोष्टी नाश पावतात.

तृष्णां छिन्द्धि भज क्षमां जहि मदं पापे रतिं मा कृथाः
सत्यं ब्रूह्यनुयाहि साधुपदवीं सेवस्व विद्वज्जनान् ।
मान्यान् मानय विद्विषोप्यनुनय प्रच्छादय स्वान् गुणान्
कीर्तिं पालय दुःखिते कुरु दयामेतत्सतां लक्षणम् ॥४॥

तृष्णा छेदून टाक, क्षमा धर, मद जिंक, पापाची आवडी धरूं नको, खरें बोल, थोरांचे मार्गानें जा, विद्वानांची सेवा कर, मान्यांस मान दे, विद्येच्या द्वेष्ट्यांस हलके कर, आपले गुण आच्छादन कर, अब्रू रक्षण कर, आणि दुःखार्तांवर कृपा कर; कांतर हीं साधूंचीं लक्षणें आहेत.

प्राणाघातान्निवृत्तिः परधनहरणे संयमः सत्यवाक्यं
काले शक्त्या प्रदानं युवतिजनकथा मूकभावः परेषाम् ।
तृष्णास्रोतो विभङ्गो गुरुषु च विनयः सर्वभूतानुकम्पा
सामान्यःसर्वशास्त्रेष्वनुपहतविधिःश्रेयसामेषपन्थाः ॥५॥

कोणाचा प्राण न घेणें, परधन हरण न करण्याचा नेम बाळगणें, खरें बोलणें, यथाकाळीं शक्त्यनुसार परोपकार करणें, परस्त्रीशीं संभाषण करण्याविषयीं मुकेपणा बाळगणें, तृष्णेच्या प्रवाहाचा भंग करणें, श्रेष्ठांविषयीं नम्रपणा, आणि सर्व प्राण्यांचे ठायीं भूतदया, याच गोष्टी पुण्याचे मार्ग आहेत असें सकल शास्त्रांचें बहुतकरून मत आहे.

वाञ्छा सज्जनसंगमे परगुणे प्रीतिर्गुरौ नम्रता
विद्यायां व्यसनं स्वयोषिति रति लोकापवादाद्भयम् ।
भक्तिः शूलिनि शक्तिरात्मदमने संसर्गमुक्तिः खलेषु
एते येषु वसन्ति निर्मलगुणास्तेभ्योनरेभ्यो नमः ॥ ६ ॥

थोर पुरुषांच्या संगतीची इच्छा, दुसऱ्याच्या गुणांवर प्रीति, वडीलांशीं आणि श्रेष्ठांशीं नम्रता, विद्येचा नाद, आपलेच स्त्रीचेठायीं रत असणें, लोकापवादाचें भय, परमेश्वरीं भक्ति, आत्मसंयमन, दुर्जनांच्या वाऱ्यासही न जाणें, हे निर्मळ गुण ज्यांचे (ह्मणजे ज्या सज्जनांचे) ठायीं वसतात त्यांस नमस्कार असो ह्मणजे तेच खरोखर पूज्य.

विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा । सदसि वाक्पटुता युधि विक्रमः ॥ यशसि चाभिरुचि व्यसनं श्रुतौ । प्रकृतिसिद्ध मिदंहि महात्मनाम् ॥ ७ ॥

आपत्काळीं धैर्य, समृद्धिकाळीं क्षमा, सभेंत अस्खलित समयसूचक मधुर भाषण, समरांगणांत पराक्रम, सत्कीर्तिविषयीं आवड, ज्ञानप्राप्तिविषयीं परमप्रीति, हे इतके गुण थोर पुरुषांच्याठायीं स्वभावतःच असतात.

प्रिया न्याय्या वृत्तिर्मलिनमसुभंगेप्यसुकरम् ।
असन्ता नाभ्यर्थ्याः सुहृदपि न याच्यः कृश धनः ॥
विपद्युच्चैः स्थेयं पदमनु विधेयं च महतां ।
सतां केनोद्दिष्टं विषमसिधाराव्रतमिदम् ॥ ८ ॥

प्रिय आणि योग्य वर्तन धंदा करणें, प्राणसंकटींही पाप न करणें, दुर्जनाचें आर्जव न करणें, श्रीमंत मित्राजवळही याचना न करणें, विपत्काळीं योग्य मोठेपणानें असणें, आणि थोरांचे पदवीस अनुसरणें ह्मणजे सद्गुण घेणें, असें हें

फार कठीण तलवारेच्या धारेप्रमाणें व्रत सज्जनास कोणीं उपदेशिलें असावें बरें? निर्मळ सद्बुद्धानें.

प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः
प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः।
विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः
प्रारब्ध मुत्तमजना न परित्यजन्ति ॥ ९ ॥

हलके पुरुष आहेत ते कोणत्याही कार्यांत विघ्नें उपस्थित होतील, ह्मणून त्यास आरंभही करित नाहींत; साधारण पुरुष आरंभ करून विघ्नांमुळें तो उद्योग सोडतात, हे आरंभशूर झाले; परंतु जे उत्तम ह्मणजे मनुष्यपणाची ह्मणून ज्यांस किंमत समजते ते विघ्नांनीं खिळून टाकिलें तरी एकदां आरंभिलेलें काम कधींही टाकीत नाहींत. कारण 'पराभवोऽप्युत्सव एव मानिनाम्' या न्यायाप्रमाणें त्यांच्या विपत्तीचें किंवा पराजयाचें पर्यवसान आस्थावृद्धीवरच होतें. याचें मूळ कारण असें कीं 'सिध्यन्ति कुत्र सुकृतानि विना श्रमेण' या वाक्याचा अर्थ त्यांच्या मनांत पूर्ण ठसला असतो. तो असा, श्रमावांचून कोठें बरें कोणतेंही काम सिद्धीस जातें? कोणतेंच नाहीं.

पाहा हा सर्व बोध किती महत्वाचा व ध्यानांत ठेवण्याजोगा आहे तो. आतां जा, धोंडू, तुह्मीं सर्वजण झोंपा. फार रात्र झाली आहे, असें बोलून संसारदृष्टीनें सर्वांस झोंपवून आपणही निजावयास गेला. नंतर कांहीं दिवसांनीं सुमुहूर्तावर सदयेचें लग्न 'न्याय' ह्मणून एक 'सुविचार' नामक सावकाराचा उत्तम मुलगा होता त्याजबरोबर निर्विघ्नपणें झालें. सर्व वाचकांनीं पक्कें लक्षांत ठे-

वावें कीं ज्याप्रमाणें दगडावर लोखंडी प्रहारांच्या रेषा उमटतात त्याप्रमाणें ह्या चार ओळी त्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व धोंडू, यांच्या अंतःकरणावर उमटतात किंवा कसें काय, हेंच आतां आपणास पाहणें आहे. फार काय लिहावें. ह्या रूपकाविषयीं अनुमानच केलें असतां बरें.

---

'SELECTED THOUGHTS OF GREAT MINDS'

## प्रपंचीं नीतिबोधपर थोर पुरुषांचीं वचनें.

( स्वकृत व निवडक. )

१ (अ) जें मनांत करावयाचें आहे तें पूर्वी जनांत मुळींच बोलून दाखवूं नये.

(ब) बोलावें थोडें मितच, पण करावें फार युक्तच.

(क) बोलायाच्या, चालायाच्या, वागायाच्या किंवा कोणतीही गोष्ट करावयाच्या पूर्वी सज्जन पुढील विचार करितात, 'आपल्या या करणीचा परिणाम परोपकारांत मोडतो किंवा नाहीं;' आणि परोपकारानें ओतप्रोत भरलेलें असेंच भरींव काम हातीं घेतात.

२ चक्रव्यूहीं अभिमन्युवीराच्या साहसापासुन पुढील धोरण लक्षांत आणावें. 'पलीकडे जाण्यापूर्वी माघारें स्वस्थानीं सुरक्षितपणें निभवून यावयास कसें मिळेल?' हा खोल विचार शांतपणें कर्मारंभापूर्वीच केला पाहिजे.

३ (अ) संशययुक्त ह्मणजे द्व्यर्थी भाषण किंवा लेखन कदापिही करूं नये, तशीच शारीरिक संज्ञाही करूं नये, ह्मणजे विपरीत मुखचर्याभास, 'डोळा मारणें' इत्यादि हावभाव करूं नयेत.

(ब) स्वार्थास्तव कोणाच्याही लहान मोठया वस्तूचा किंवा हिताचा अपहार ( फसवणूक ) करूं नये.

अशा रीतीनें असत्यास भिऊन एकसारखें सावधगिरीनें वा-

गन्यास कांहीं काळानें तेंच आम्हांस भिऊन दूर दूर पळ काढितें.

४ कोणीही भला मनुष्य दोष ठेवील असें करूं नये. 'लाज आपल्या मनाची, दांभिक ती जनाची.'

५ विद्येचा उपयोग सद्वर्तन व सदुद्योगप्रीति; परंतु विद्वत्तेचा तिजबद्दल डौल मिरविणें हा नव्हे, तर 'बोल बोलतां वाटती सोपे, करणी करितां तिरडी कांपे' यांतील मर्म बजावणें, हा होय.

६ कोठें कसें बसावें—कोणीही मनांत देखील न बोले ' ऊठ! कोठें किती व कसें बोलावें—कोणीही मनांत देखील न म्हणे 'पुरे!

७ मूर्ख असतात त्यांस वाटतें कीं आपलें आचरण लोकदृष्ट्या शहाणपणच आहे. त्यांचे ध्यानींमनींही पुढील निर्मळ सदसद्विवेकबुद्धीची गोष्ट येत नाहीं. 'आपल्या अपरोक्ष आपल्या वर्तनास लोक शुद्ध पक्कें सोळींव मूर्खपण म्हणतात.'

८ सर्वांच्या हितार्थ जगावें म्हणून खावें प्यावें, परंतु खावें प्यावें म्हणून मात्र जगूं नये.

९ हरएक गोष्टींत चांगलें करण्याची दुर्मिळ अमृतरूप संधि दवडूं नये; वाईट करण्यास संधि फार, साधन स्वल्प व परिणाम सर्वांशीं भयावह, कारण तें समूळ अपकारक विषच होय.

१० (अ) आपली चूक आपणास ताबडतोब प्रत्यक्ष दाखविणारा आपल्या शुद्ध सदसद्विचारज्ञानासारखा आपला लगत मित्र दुसरा कोणीच नाहीं.

(ब) ज्याची चूक त्यास सांगून समजावणारे असे स्नेही थोडेच, आणि ती मान्य करणारा तर फारच विरळा.

(क) थोर पुरुष आपला अपराध कबूल करितात, यामुळें तसें करण्यालायक आपण नव्हत, असें स्पष्ट ते सिद्ध करून दाखवितात.

११ दुर्जन हलकटांची पळभरही संगत धरूं नये. कलालाच्या हातांतील दूधही दारू असावी, असें जन समजणारच.

१२ बहुधा मनुष्याच्या स्वभावाचा असा अप्रबुद्ध कल दिसतो कीं तो आपल्यावर दुसऱ्यानें केलेले उपकार बरेच लवकर

विसरतो, पण अपकारांची गांठोडी बांधून जपून ठेवितो ! अशी-च दुसऱ्यांवर क्षुल्लकही केलेल्या उपकारांची थैली स्मरणशक्तींत असतेच !!

१३ ज्याअर्थी प्रत्येक मनुष्यास संकटसमयीं असें वाटतें, कीं आपणास दुसऱ्या समर्थ लोकांनीं या पडत्याकाळीं बाजू घ्यावी ह्मणजे यथाशक्ति मदत करावी त्याअर्थी हरएक मनुष्य-मात्रानें आपला वर्तनक्रम सदा परोपकारशीलच ठेविला पाहिजे. रावाचे रंक, रंकाचे राव होऊन कधीं तरी कसा काळ येऊन ठेपेल याचा मुळींच नेम नाहीं.

१४ अति प्रीतीच्याठायीं दोष किंवा अन्याय यांविषयीं डोळेझांक होते.

१५ मोठेपणा नीच लोकांचा, करितो हालहवाल इतरांचा. मोठेपण थोर लोकांचें, वाढवितेंही सुख नीचांचें.

१६ चंदन अग्नींत टाकला तरी अधिक आधिक सुवास दे-तोच, साक्षात् तोडणाऱ्या कुऱ्हाडीच्याही तोंडास सुवास देतो, त्याचप्रमाणें महात्म्यांस दुष्टांनीं कसें कितीही दुःख दिलें तरी त्यांची सद्बुद्धी कमजास्त फलप्रद—परोपकारशील—होत नाहीं.

१७ विनोद—खरी स्तुती ही थोरांची कन्या, अद्यापि कुमा-रिकाच आहे! कारण तिला 'खरा मोठा' असा मनुष्य वर पाहिजे पण तो तर तिला वरण्यास खुषी नसतो. आणि 'दांभि-क मोठे' असे नवरे तिजविषयीं वारंवार आदरानें मागण्या क-रितात पण ती तर त्यांजकडे ढुंकूनही पाहाण्यास राजी नाहीं !

१८ कोणताही मोठा बेत किंवा मसलत घाईनें फसते, आ-णि धीराच्या युक्तीनें हांसते ह्मणजे विजयी होते.

१९ द्रव्यवानासही योग्य श्रमावांचून सुख होत नाहीं. मग गरीबानें ते केले असतां दोन्ही साधतील—उदरनिर्वाह व विश्रांति.

२० प्रकृत सुखानुभवापेक्षां पुढें येणाऱ्या सुखाची मोघम आशा मनुष्यमात्रांस पूर्वींच फार आनंदवित असते.

२१ आपलें दुसऱ्यांनीं वाईट केलें तर कडू लागतें, पण दुस-ऱ्याचें वाईट आपण केलें तर गोड लागतें,—हीं दुष्टजनप्रवृत्ति.

२२ दुःखें प्राप्त व्हावींत अशी काडीमात्र इच्छा नसतां तीं अशीं येतात तशींच सुखें आहेत, असें जाणून या वाहत्या गंगेच्या ओघांत आपलें कर्त्तव्य बजावून हात धुण्यास तिळभरही अंतर करूं नये.

२३ मूर्खांच्या सहवासापेक्षां दुःख तें कोणतें? वेळेवार कोणतेंही कार्य न होणें याहून नुकसानी ती कोणती? आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेवणें, यापेक्षां मनुष्यपण तें कोणतें? स्वतंत्रतेसारखें सुख तें कोणतें? कायावाचामनोभावें पतीस आज्ञांकित अशा सुशील स्त्रीहून दुसरी ती पतिव्रता कोण?

२४ आंधळा कोण? असून पाहत नाहीं तो. बहिरा कोण? ऐकतां येत असून ऐकत नाहीं तो. मुका कोण? समयोचित बोलतां येत असून भिडे भाडेनें किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणांमुळें स्तब्ध राहातो तो. लंगडा कोण? मनुष्य असून पशुवत् वागतो तो. हे सर्वच पशू होत.

२५ (अ) एकलकोंडा आणि गर्वाचा मांडा.

(ब) देशाचा इतिहास ह्मणजे थोर व हलकट मनुष्यांच्या चरित्रांचा गाथाच होय. हीं केवळ अनुभव भांडारस्वरूप शिक्षकच आहेत. तशींच हरएक संकटेंहीं हीं साक्षात् गुरुच होत.

(क) खऱ्या पराक्रमाचे बीजावर कशाही पराजयाचें दड पण पडलें तरी धैर्याचें पाणी त्यास पुनः पुन्हा मिळाल्यास त्यास अंकुर आल्याविना राहाणारच नाहीं. यास उदाहरण–पर्वां आफगानिस्तानचे लढाईत साधारण १३।१४ रुपड्यांचा हिंदु धौकलसिंग नामक शिपाई आपल्या आंगच्या खऱ्या खऱ्याच पराक्रमानें जीवावर उदार होऊन तलवार गाजवून एक गोरी व एक काळी अशा दोन पलटणी शत्रूंच्या जबड्यांतून सुरक्षितपणें घेऊन आला! ह्मणूनच आतां मोठा पगारदार मानकरी–होऊन 'सरदार बहादूर' ही पदवी पावला. या किताबाखेरीज यांस महाराणी विक्टोरिया

यांनीं आपल्या हातांतील एक अमूल्य आंगठी बक्षीस
दिली आहे, असें कळतें.

(ड) सरकार ह्मणजे सर्व लोकांनीं आपला सार्वजनिक कारभार योग्य सत्य न्याय दयेनें चालविण्यास्तव नेमलेली विश्वासू मंडळी, किंवा राजा या नांवाचा मुनीम; ह्मणून सरकार सन्मित्रवत् किंवा आईप्रमाणें प्रजेच्या जीवाचें, स्वातंत्र्याचें आणि मालमत्तेचें पालन करितें किंवा नाहीं, हें पाहाणें लोकांचें ह्मणजे प्रजेच काम आहे.

२६ कोणतेंही कसब, कलाकौशल्य, विद्या, उद्योग धंदा, याविषयीं आपल्या अंगीं उपजतच बुद्धिवैभव आहे किंवा नाहीं, याचा विचार करण्याच्या पंचायतींत मनुष्यानें प्रथमतः फारसें मुळींच पडूं नये; पण यांतपणें मात्र तदर्थ सक्त परिश्रम करावेच, ह्मणजे त्याचें साहजिक पर्यवसान योग्य होईल, यांत मुळींच संशय नाहीं; ह्मटलेंच आहे—

तुकाह्मणे आभ्यासानीं ॥ सख्य होय नारायणीं ॥ ६ ॥

असें असतां बाकीच्या गोष्टींची ती काय कथा? निकट निश्चयापुढें विघ्नेंही कार्योत्साहलग्नें करण्यास सिद्ध होतात!!!

सारांश, मनुष्यमात्रानें मनाच्या कलाप्रमाणें न वागतां योग्या योग्य विचारकरून अयोग्य असेल त्यांत आपली सोय दिसली तरी किंवा तें कोणत्याही वळगामुळें आवडत असलें तरी शुष्क लोकरीति किंवा जनप्रियता संभाळण्याकरितांही त्याच्या वाऱ्यास न जातां मनोनिग्रहानें तें मृत्युरूप मानून टाकावें; आणि योग्य असेल त्यांत कितीही विघ्नें आलीं तरी किंवा तें आवडत नसलें तरी तेंच एक खरें यशरूप आहे असें जाणून पदरीं बाळगावें.

श्लोक

२७ स स्निग्धोऽकुशलान्निवारयति यस्तत्कर्म यन्निर्मलं
सा स्त्री याऽनुविधायिनी स मतिमान् यः सद्भिरभ्यर्च्यते ॥

साभीर्या न मदंकरोति स सुखी य स्तृष्णया मुच्यते
तन्मित्रं यदकृत्रिमं स पुरुषो यः खिद्यते नेन्द्रियैः ॥

जो दुःखिताचें दुःख निवारण करतो तोच दयालु, जें निर्दोष तेंच कर्म, जी सांगितल्याप्रमाणें वागणारी तीच स्त्री, ज्याला सज्जन लोक पूज्य मानतात तोच बुद्धिवान्, ज्याला आशा नाहीं तोच सुखी, जो निष्कपटी तोच मित्र, आणि जो इन्द्रियबलानें दुःखी होत नाहीं तोच पुरुष होय

**श्लोक**

**२८ दुर्जनो नाऽऽर्जवं याति सेव्यमानोऽपि नित्यशः॥**
**स्वेदनाऽभ्यंजनोपायैःश्वपुच्छमिव नामितम् ॥**

दुर्जन जो आहे त्याची नित्य सेवा केली तरी त्याचा स्वभाव सरळ व्हावयाचा नाहीं. कुत्र्याच्या शेंपटीला तेल लावून घाम निघेपर्यंत पुष्कळ चोळलें तरी तें सरळ व्हावयाचें नाहीं !

**श्लोक**

**२९ वर्धयन्वाऽथ सन्मानं खलानां प्रीतये कुतः ॥**
**फलंत्यमृतसेकेऽपि न पथ्यानि विषद्रुमाः ॥**

दुर्जनाला पोसून वाढविलें किंवा त्यांचा मोठा सन्मान केला तरी त्यांना त्यामध्यें संतोष कोठून वाटणार आहे ? विषवृक्षाला अमृत शिंपून वाढविलें तरी त्याला चांगलीं फळें कोठून येणार ?

**श्लोक**

**३० अप्रियाण्यपि कुर्वाणो यः प्रियः प्रिय एव सः॥**
**दग्धमंदिर सारेऽपि कस्य वन्हावनाद ॥**

जो प्रिय असतो त्यानें आपल्या मताविरुद्ध असें आपलें अप्रिय जरी केलें तरी तो अप्रिय होत नाहीं. उत्तम वाडा जाळला म्हणून अग्नीविषयीं कोणाचा आनादर राहिला आहे काय ?

श्लोक

प्राणी, आप्त, कनिष्ठ, श्रेष्ठजनजे, त्यांतेंसदा सन्मतें, ॥
वर्ते उद्यम स्वात्मसेवकपणा, स्वातंत्र्य धारिष्टतें, ॥
यातें पोषुन, लक्षपूर्वक करी विस्तीर्ण आलोचना, ॥
संपादी पटुयुक्ति सूचनलता, संकोचता सज्जना. ॥

श्लोक

घे घे सभ्यपणा, सुयुक्त अशना, आरोग्य संवर्द्धना, ॥
संतुष्टत्वगुणा, मितव्ययपणा, लोकोपकारीमना, ॥
अक्रोधादिक क्षांति हीच सुमना, भोगी क्षमा सद्धना, ॥
सौम्यत्वादिक भूषणा धरि, रमे या सद्गुणांच्यावना; ॥

श्लोक

जें सत्य तें सेवित नित्य जावें, ॥
ममता, शौर्य गुणास ध्यावें, ॥
स्वदेश प्रीतीस मनीं धरावें ॥
नीतीसरे सौख्य दया भजावें ॥

श्लोक

कर्मे दास्यपणें करोनि निपुणें नारायणा अर्पणें ॥
पापातें क्षपणें रमापतिगुणें प्रेमामृत सेवणें ॥
सत्संगें वसणें स्मृतींत असणें एकांतिचें बैसणें ॥
हें सर्वी करणें भवाब्धि तरणें दुर्वासना मारणें ॥

समाप्त.